


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ४९ * नांदेड * शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकन सुप्रीम कोर्टाचा दणका, टॅरिफचा निर्णय बेकायदेशीर ठरवला

**न्यूयॉर्क (वृत्तसंस्था)–** अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानं शुक्रवारी डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का दिला आहे. सुप्रीम कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून दुसऱ्या देशांवर लादण्यात येत असलेले टॅरिफ बेकायदेशीर ठरवण्यात आले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर टॅरिफ लादताना त्यांच्या अधिकारांच्या मर्यादांचं उल्लंघन केल्याचं सुप्रीम कोर्टानं म्हलं. या निर्णयातील माहितीनुसार राष्ट्रीय आपत्कालीन स्थितीत लागू करण्यात येणाऱ्या कायद्याचा वापर करत ट्रम्प यांनी टॅरिफ लादले.

अमेरिकेच्या संविधानानुसार कर आणि टॅरिफ लादण्याचा अधिकार राष्ट्रपतींना नसून काँग्रेस म्हणजेच संसदेला मिळालेला आहे. मात्र, ट्रम्प यांनी टॅरिफला एक आर्थिक आणि विदेशी धोरणासाठी ढाल म्हणून वापरलं. ट्रम्प यांनी हे निर्णय अमेरिकेच्या आर्थिक सुरक्षेसाठी महत्त्वाचे असल्याचं म्हटलं होतं. टॅरिफ शिवाय अमेरिका उद्धवस्त होईल, असं ट्रम्प म्हणाले होते.



ट्रम्प यांचे टॅरिफ लावण्याचे निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून अवैध ठरवण्यात आले आहेत. शांततेच्या काळात टॅरिफ लावण्याचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या काँग्रेसकडे असल्याचं अमेरिकन सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने आज डोनाल्ड ट्रम्प जागतिक टॅरिफ संदर्भात महत्त्वाचा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने ६-३ बहुमताने (६ विरुद्ध ३) ट्रम्प यांच्या अनेक टॅरिफला अवैध ठरवले आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की, ट्रम्प यांनी International Emergency Economic Powers Act (IEEPPA) या १९७७ च्या कायद्याचा वापर करून राष्ट्राध्यक्ष म्हणून एकतर्फीपणे व्यापक टॅरिफ लावण्याचा अधिकार अमर्यादपणे वापरला आहे. मुख्य न्यायमूर्ती जॉन रॉबर्ट्स यांनी बहुमताचा निर्णय लिहिला. त्यात म्हटले आहे की, शांततेच्या काळात टॅरिफ लावण्याचा अधिकार फक्त अमेरिकेच्या काँग्रेसकडे (सभागृहाकडे) आहे.

राष्ट्राध्यक्षांना अशा मोठ्या अधिकारासाठी काँग्रेसची परवानगी आवश्यक असते. निर्णयात म्हटले आहे की कायद्याने राष्ट्रपतीला टॅरिफ लावण्याचा अधिकार दिलेला नाही. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील आर्थिक धोरणातील एक मोठा धक्का समजला जातोय. सर्वोच्च न्यायालयात ६ विरुद्ध ३ च्या बहुमताने निर्णय झाला आहे. हे टॅरिफ अनेक देशांवर जागतिक स्तरावर लागू केले गेले होते, ज्यामुळे अमेरिकन आयातदारांना अब्जावधी डॉलर्स दंड भरावा लागला होता.

## राज्यात मतदार यादीच्या विशेष पडताळणी प्रक्रियेला सुरुवात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** एप्रिल २०२६ पासून मतदार यादीच्या विशेष पडताळणी प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. या प्रक्रियेशी संबंधित तयारीचे कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक आयोगाच्या मुख्य अधिकाऱ्यांना दिले आहेत.

महाराष्ट्रासोबत आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, चंदीगड, दादर आणि नगर हवेली, दमण- दीव, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, कर्नाटक, लडाख, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, दिल्ली, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगणा आणि उत्तराखंड या २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर राबवली जाणार आहे.

या पत्रात म्हटले की, निवडणूक आयोगाने गेल्या वर्षी २४ जून रोजी संपूर्ण देशात एसआयआर राबवले जाईल असा आदेश दिला होता. दरम्यान बिहारनंतर देशातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २८ ऑक्टोबर २०२५ पासून ही प्रक्रिया सुरु आहे. या प्रक्रियेत मतदार यादी अद्ययावत केली जात आहे. नवीन मतदारांची नावे जोडली जात आहेत. तसेच नावे वगळली जात आहेत आणि मतदार यादीतील चुका सुधारल्या जात आहेत.

# उन्हाळ्याची चाहुल; राज्यात तापमान वाढण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** हळुहळु थंडी कमी होत आहे, तापमानात वाढ झाली असून, उन्हाळ्याची चाहुल जाणवू लागली आहे, मात्र याचदरम्यान वातावरणात मोठा फेरबदल पहायला मिळत आहे. भारतीय हवामान विभागाकडून तब्बल ९ राज्यांना पावसाचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्यानं दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील चार दिवस ९ राज्यांमध्ये मध्यम ते हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर हवामान खात्याकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. याच काळात हवेचा वेग देखील जास्त असणार आहे, पावसासोबतच ४० ते ४५ किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे पुढील दोन ते तीन दिवस गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये तापमानात दोन ते तीन डिग्री सेल्सिअस अंशाने वाढ होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील १६ तासांमध्ये ९ राज्यात पावसाला सरुवात होण्याची शक्यता आहे. पावसासोबतच हवेचा वेग देखील जास्त राहणार असल्यामुळे हवामान विभागाकडून या पार्श्वभूमीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे, आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार जम्मू काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, केरळ, तामिळनाडू, अंदमान आणि निकोबार बेटं, छत्तीसगड, ओडिशा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये २३ फेब्रुवारीपर्यंत हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर दुसरीकडे उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये पावसासोबतच बर्फावृष्टीची देखील शक्यता आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी तामिळनाडू आणि केरळमध्ये हवेचा वेग जास्त राहणार असून, प्रति तास ३५ ते ४५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. या काळात या दोन राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी छत्तीसगड आणि ओडिशामध्ये मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रामध्ये तापमानात वाढ होणार आहे, तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहणार असून, तुरळक ठिकाणी पावसाचा देखील इशारा देण्यात आला आहे. राज्यात आता उन्हाळ्याची चाहुल जाणवू लागली आहे. पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये राज्यातील काही भागांमध्ये पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

## २२ राज्यांमध्ये एसआयआर होणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** बनावट मतदार याद्या रोखण्यासाठी आणि बनावट मतदारांची नावे वगळण्यासाठी, निवडणूक आयोगाने आता देशभरात विशेष सघन पुनरावृत्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. नुकतीच ही घोषणा करण्यात आली असून निवडणूक आयोगाचे सचिव पवन दिवाण यांनी २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र लिहून डखठ ची तयारी लवकरात लवकर पूर्ण करण्यास सांगितले. निवडणूक आयोगाने पत्रात म्हटले आहे की, दिल्ली आणि कर्नाटकसह २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर प्रक्रिया एप्रिलमध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.

निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये एसआयआर आयोजित केला. त्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर सुरू आहे, जो २८ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होईल. काही राज्यांसाठी अंतिम मसुदे प्रसिद्ध झाले आहेत, तर काहींमध्ये सुधारणा सुरू आहेत. यामध्ये मतदार यादीत नवीन मतदार जोडणे आणि मृत मतदारांना वगळणे समाविष्ट आहे.

## देशात ‘एआय’ वापरासाठी नवे नियम

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** कृत्रिम बुद्धिमत्तेने (एआय) तयार केलेला फोटो, व्हिडिओ किंवा ऑडिओ आता लेबलशिवाय चालणार नाही. केंद्र सरकारने आयटी नियमांमध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार अशा प्रत्येक कंटेंटवर स्पष्टपणे AI Generated किंवा तत्सम ‘ऑथेंटिसिटी लेबल’ लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासोबतच सोशल मीडिया कंपन्यांसाठी सर्वात मोठा बदल म्हणजे कोणत्याही आक्षेपार्ह किंवा बेकायदेशीर कंटेंटबाबत तक्रार आल्यास तो ३ तासांच्या आत हटवणे बंधनकारक असेल. यापूर्वी ही मुदत ३६ तासांची होती.

## देशात ३२ बनावट विद्यापीठे जाहीर; महाराष्ट्रातील दोनचा समावेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशात शिक्षणाच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. देशातील बनावट विद्यापीठांचे जाळे आता १२ राज्यात पोहचले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश आहे. तर दिल्लीतील तब्बल १२ विद्यापीठांचा समावेश (दिल्लीमधील १० तर नवी दिल्लीतील २ विद्यापीठे) या बनावट विद्यापीठांच्या यादीत आहे. या यादीनुसार उत्तरप्रदेश राज्यात दिल्लीनंतर सर्वाधिक ४ बनावट विद्यापीठे आहेत. गेल्या दोन वर्षांत देशातील अशा संस्थांची संख्या २० वरून ३२ झाली आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थी आणि पालकांना




सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. तसेच प्रवेश घेताना काळजी घेण्याचे आवाहनही केले आहे.

या बनावट यादीत महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश आहे. त्यामध्ये राजा अरबी विद्यापीठ नागपूर आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठाचा समावेश आहे. या नवीन आकडेवारीनुसार बनावट विद्यापीठांचे जाळे नवीन चार राज्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामध्ये हरियाणा राजस्थान, झारखंड आणि अरुणाचल प्रदेश राज्यांचा समावेश आहे. धक्कादायक बाब म्हणजे ३२ बनावट विद्यापीठांपैकी तब्बल १२ एकट्या दिल्लीत कार्यरत आहेत. विशेष म्हणजे त्यातील काही संस्था यूजीसी मुख्यालयापासून काही मीटर अंतरावर आहेत. नवीन आकडेवारीनुसार, दिल्लीत १२, उत्तर प्रदेशात ४ तर केरळ, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पुदुचेरी, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात प्रत्येकी २, तर हरियाणा, राजस्थान, झारखंड आणि अरुणाचल प्रदेशात प्रत्येकी एक बनावट विद्यापीठे आढळून आली आहेत.

## राज्यातील दोन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील दोन ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आदेशाने दोन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

राजेश नार्वेकर यांची मुंबई येथील परिवहन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समीर कुरतकोटी यांची मुंबई येथील शुल्क नियामक प्राधिकरणाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हातात घेतल्यापासून गेल्या वर्षभरात बदल्यांचा धडाका सुरू आहे. प्रत्येक १०-१५ दिवसांना सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या होत आहेत.




**नांदेड :** निर्मल प्रकाशनचे निर्मलकुमार सुर्यवंशी यांना साहित्य निर्मिती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या भाषा विभागातर्फे श्री भागवत पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आ. बालाजी कल्याणकर यांनी निर्मलकुमार सुर्यवंशी यांचा सपत्नीक सत्कार केला. यावेळी नगरसेवक सुहास कल्याणकर, ज्येष्ठ सहित्यिक प्रा. जगदीश कदम, ज्येष्ठ साहित्यिक भगवान अंजनीकर, आशाताई पैठणे, डॉ. प्रमोद देशपांडे, दि.मा. देशमुख, सौ. सिंधूताई सुर्यवंशी, साहित्यिक नारायण शिंदे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)


## नरहरी झिरवाळ यांच्याकडून खासगी सचिवाची हकालपट्टी

**मुंबई (प्रतिनिधी)–** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या कारवाईनंतर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आपले खासगी सचिव डॉ. रामदास गाडे यांची हकालपट्टी केली आहे. गाडे यांना अन्न व औषध प्रशासन विभागातून कार्यमुक्त करून त्यांच्या मूळ आस्थापनेत (कृषी व पदुम विभाग) परत पाठवण्याचे आदेश झिरवाळ यांनी दिले आहेत. काही दिवसांपूर्वी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरिंगे याला ३५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले होते.

# पोलीस कर्मचाऱ्यांशी धक्काबुक्की; फटाका बुलेट वाजविणाऱ्या दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बदल करून फटाकेसारखे आवाज फोडणाऱ्या व परिसरात दहशत माजविणाऱ्या आणि त्यांना ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांशी धक्काबुक्की करणाऱ्या दहा जणांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिरवणुकीच्या निमित्ताने आपल्या बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बदल करून फटाके फोडणारे कर्णकर्कश आवाज करून व ध्वनी प्रदूषण करणाऱ्या प्रदीप पंढरीनाथ सुर्वे (वय २०), प्रथमेश नंदकुमार दळवे (वय २२), वैभव अच्युतराव दळवे (वय २३), हनुमंत संजय तोरणे (वय २०), ओमकार भरकटे व त्यांच्या इतर पाच साथीदारांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. प्रथमेश दळवे याच्याकडून (एमएच २६- बीएल- ८१ ५६) क्रमांकाची बुलेट जप्त केली. हे सर्व आरोपी वडेपुरी तालुका लोहा येथील रहिवासी आहेत. आरोपीला ताब्यात घेऊन ठाण्यात असताना त्याने गैरकायद्याची मंडळी जमवून चक्क पोलीस अंमलदार उद्धव सावंत यांना धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला, तसेच जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदीचा आदेश पायदळी तुडविला. अखेर या प्रकरणात उद्धव सावंत यांच्या फिर्यादीवरून दहा जणांविरुद्ध विविध कलमान्वये विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे करत आहेत. फटाके फोडणाऱ्या बुलेटधारकांना पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या आदेशावरून चांगलाच प्रसाद दिला.




## अर्धापूरात किरकोळ कारणावरून तरुणाचा खून




**अर्धापूर (प्रतिनिधी)–** येथील तरूण व्यंकटी चांदू वाघमारे (वय २५ वर्ष) रा. प्रज्ञा बौद्ध विहाराच्या बाजूला मयत तरुण व आरोपी यांच्यात किरकोळ वाद झाला. यात व्यंकटी वाघमारे या तरुणांच्या गुप्त अंगाला मार लागल्याने तो बेशुद्ध झाला होता. उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले.


या प्रकरणी पोलिसांनी वेळीच समय सूचकता दाखवत ४ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून या प्रकरणी फिर्याद देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम, सपोनि विष्णुपंत कराळे, ठाणे अंमलदार जमदाडे पोलीस कर्मचारी गौतम कांबळे, इंदू गवळी यांनी मदत केली.

# अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव लिखित विद्यार्थी धर्म पुस्तकास उत्कृष्ट साहित्यकृती ग्रंथ पुरस्कार जाहीर

### आज पुणे येथे होणाऱ्या सोहळ्यात होणार पुरस्काराचे वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव लिखित अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या विद्यार्थी धर्म पुस्तकाला उत्कृष्ट साहित्यकृती ग्रंथ पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण शनिवार, दि.२१ फेब्रुवारी रोजी पुणे येथे होणार आहे.

मूळचे सांगली जिल्ह्यातील रहिवासी असलेले सध्या अपर पोलीस अधीक्षक या पदावर कार्यरत असलेले सुरज गुरव यांनी यापूर्वी नांदेड शहरांमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून सेवा बजावलेली आहे. सध्या सर्वार्थाने दुर्लक्षित असलेल्या प्राचीन संस्कृतीचा ऐतिहासिक ठेवा असलेल्या नंदगिरी किल्ल्यांचे रक्षण व संवर्धन यांची मोहिम त्यांनी हाती घेतलेली आहे. या आगळ्या वेगळ्या उपक्रमास नांदेडकरांनी





भरभरून प्रतिसाद दिला.

माझं गडप्रेम या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी स्वतःचा अनुभव आणि तरुणाईला प्रेरणा देणारे प्रसंग यातून किल्ले संवर्धन या बाबतीत विचार त्यांनी शब्दबद्ध केले आहे. त्याची तिसरी आवृत्ती आगामी काळात येणारच आहे.

विद्यार्थी धर्म या पुस्तकासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ खर्च केला व विद्यार्थी धर्म या पुस्तकाची त्यांनी डिसेंबर २०२५ मध्ये निर्मिती केली.या पुस्तकाला उदंड प्रतिसाद मिळाला. सदरील पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी नांदेड येथे एका शानदार समारंभात पार पडला.

पुणे मनपा, मराठी भाषा संवर्धन समिती, संवाद पुणे व यशदा आयोजित दुसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन-२०२६ या संमेलनासाठी होणाऱ्या सर्वोत्कृष्ट साहित्यकृती ग्रंथ पुरस्कार यासाठी विद्यार्थी धर्म या पुस्तकाची निवड करण्यात आलेली आहे. या पुरस्काराचे वितरण दुसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन-२०२६ बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे दि.२१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता होणार आहे.

## टी २० वर्ल्डकपमध्ये भारत-पाक पुन्हा आमने सामने येण्याची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** टी २० वर्ल्ड कप २०२६ मध्ये २१ फेब्रुवारीपासून सुपर ८ चे सामने सुरु होणार आहेत. भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असल्यानं त्यांच्यातील सामना १५ फेब्रुवारीला पार पडला होता. हा सामना भारतानं ६१ धावांनी जिंकला होता. भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघ अ गटातून सुपर ८ मध्ये दाखल झाले आहेत. सुपर ८ मध्ये दोन्ही संघ वेगवेगळ्या गटात आहेत. त्यामुळं दोन्ही संघांमध्ये सुपर ८ मध्ये सामना होणार नसला तरी उपांत्य फेरीत किंवा अंतिम सामन्यात दोन्ही संघ आमने सामने येऊ शकतात.

भारतानं साखळी स्पर्धेतील सामना एकतर्फी जिंकला होता. आता भारत आणि पाकिस्तान पुन्हा आयसीसीच्या इव्हेंटमध्येच आमने सामने येऊ शकतात. टी २० वर्ल्ड कपमध्ये आमने सामने येण्याची शक्यता कशी आहे हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. सुपर ८ मधून भारत आणि पाकिस्तान पुढे गेल्यास उपांत्य फेरीत आमने सामने येऊ शकतात.

टी २० वर्ल्ड कपमधील सुपर ८ मधील लढती ठरल्या आहेत. ८ संघांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान वेगवेगळ्या गटात आहेत. ज्यामुळं भारत आणि पाकिस्तान सुपर ८ मध्ये आमने सामने येणार नाहीत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# शालेय विद्यार्थ्यांचे आयुष्य धोक्यात

डिजिटल युगात वाढणारी पिढी ही देशाची सर्वात मोठी संपत्ती मानली जाते. मात्र आज हीच पिढी मोबाईल, टॅब आणि संगणकाच्या पडद्यामागे एका अदृश्य पण अत्यंत घातक जाळ्यात अडकत चालली आहे. खेळ, करमणूक आणि तंत्रज्ञानाच्या नावाखाली शालेय वयातील मुलांमध्ये वाढत असलेले ऑनलाईन गेमिंगचे व्यसन केवळ आरोग्य किंवा अभ्यासापुरते मर्यादित राहिलेले नाही; ते आता देशाच्या सुरक्षित भविष्यासाठी गंभीर आव्हान ठरत आहे. अलीकडे समोर आलेल्या आंतरराष्ट्रीय अहवालानुसार, दहशतवादी संघटना आणि द्वेष पसरवणारे कट्टर गट सोशल मीडियावर कडक नियंत्रण वाढल्यानंतर आता थेट गेमिंग प्लॅटफॉर्मकडे वळले आहेत. ११ ते १७ वयोगटातील मुले ही त्यांची प्रमुख लक्ष्य आहेत. कारण या वयात कुतूहल जास्त, समज कमी आणि डिजिटल आकर्षणाला विरोध करण्याची ताकद मर्यादित असते. तासन् तास गेम खेळण्यात गुंतलेली मुले नकळतपणे कट्टर विचारांच्या संपर्कात येत आहेत, ही बाब अत्यंत धोकादायक आहे. विशेषतः रोबलक्स, मिनीक्राफ्ट यांसारखे 'सँडबॉक्स' प्रकारचे गेम आणि डिसकॉर्डसारखे संवाद माध्यमे दहशतवादी गटांसाठी सोयीचे व्यासपीठ ठरत आहेत. या गेम्समध्ये युजरने तयार केलेली सामग्री प्रचंड प्रमाणात असल्याने तिच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे जवळपास अशक्य झाले आहे. याच पळवाटीचा गैरफायदा घेत कट्टर गट मुलांपर्यंत पोहोचत आहेत. या संपूर्ण प्रक्रियेला दहशतवादी संघटना 'फनल स्ट्रॅटेजी' अर्थात चंचू प्रवेश म्हणतात. सुरुवातीला टिकटॉक किंवा एक्ससारख्या प्लॅटफॉर्मवरून आकर्षक आणि धोकादायक नसलेले वाटणारे मीम्स, व्हीडीओ किंवा संदेश दाखवून मुलांचे लक्ष वेधले जाते. त्यानंतर गेममधील गुप्त मोड, खासगी सर्व्हर किंवा विशेष टास्कच्या नावाखाली त्यांना जवळ केले जाते. शेवटी एन्क्रिप्टेड चॅट प्लॅटफॉर्मवर ही प्रक्रिया इतकी सूक्ष्म आणि टप्प्याटप्प्याने होते की अनेकदा पालकांनाही त्याची चाहूल लागत नाही. शालेय मुलांमध्ये वाढत असलेले गेमिंगचे व्यसन ही या धोक्याची मुळे आहेत. सतत स्क्रीनसमोर बसणे, आभासी जगात रमणे आणि खऱ्या समाजापासून दूर जाणे यामुळे मुलांची मानसिक जडणघडण असंतुलित होत आहे. अभ्यास, खेळ, सामाजिक संवाद यांना दुय्यम स्थान मिळत असून आक्रमकता, एकटेपणा आणि संवेदनशीलतेचा अभाव वाढताना दिसतो. अशा अवस्थेत कट्टर विचारसरणी सहज रुजवता येते, ही बाब राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक आहे. पालकांच्या देखरेखीतील मर्यादा, कायदेशीर अडथळे आणि तांत्रिक गुंतागुंत यामुळे ही समस्या अधिकच गंभीर बनते. संशयित व्यक्ती अल्पवयीन असल्यास कारवाई गुप्त ठेवली जाते, त्यामुळे समाजाला या धोक्याची तीव्रता पुरेशी समजत नाही. परिणामी, ही समस्या वैयक्तिक पातळीवरच मर्यादित राहते, जेव्हा की तिचे परिणाम राष्ट्रीय पातळीवर होऊ शकतात. आज गरज आहे ती केवळ पालकांच्या सावधगिरीपुरती मर्यादित न राहता व्यापक धोरणात्मक निर्णयांची. पालकाकडे खूप पैसे आहेत म्हणून आपल्या पाल्यांना महागडा मोबाईल विकत घेऊन देणे म्हणजे त्या पाल्याचे आयुष्य बरबाद करण्यासाठीच आहे, याचाही विचार श्रीमंत पालकांनी केला पाहिजे. म्हणूनच पालकांनी आपल्या तथाकथित व्यस्त जीवनातून मुलांसाठी वेळ काढून त्यांचा स्क्रीन टाइम मर्यादित करणे, मुलांशी सतत संवाद ठेवणे ही पावले उचलणे आवश्यक आहेतच; पण असे फारसे होत असल्याचे दिसत नाही. कारण हा प्रश्न केवळ कुटुंबाचा नाही, तर देशाच्या भविष्यातील सुरक्षिततेचा आहे. अशा मुलांमध्ये काही मानसिक बदल दिसून येतात जे खऱ्या शिक्षकांच्या ध्यानात येतात अशा विद्यार्थीप्रेमी शिक्षकांनी तत्काळ त्याची नोंद घेऊन पालकांना कळविले पाहिजे नव्हे हे त्यांचे कर्तव्यच आहे. त्याचप्रमाणे शालेय वयातील मुलांसाठी काही ऑनलाईन गेम्सवर कठोर निर्बंध, तर गरज पडल्यास थेट बंदी घालण्याचा विचार गांभीर्याने करावा लागेल. जसे अमली पदार्थ, धोकादायक खेळणी किंवा आरोग्यास अपायकारक पदार्थांवर बंदी घातली जाते, तसेच मानसिक आणि वैचारिक सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या डिजिटल खेळांवरही निर्बंध हवेत. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण, कौशल्यविकास आणि सर्जनशीलतेसाठी व्हावा. देशाचे सुरक्षित भविष्य हे सजग, समतोल आणि विवेकी पिढीवर अवलंबून आहे. आज जर आपण गेमिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या या 'डिजिटल शिकारी'कडे डोळेझाक केली, तर उद्या त्याची किंमत संपूर्ण देशाला मोजावी लागू शकते. म्हणूनच वेळेत जागे होणे, कठोर निर्णय घेणे आणि मुलांचे भवितव्य सुरक्षित हातात देणे हीच खरी देशभक्ती ठरेल.

# आसामची आयर्न लेडी डॉ. संजुक्ता पराशर

पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या पोलीस सेवेत आज महिला अधिकारी केवळ सहभाग घेत नाहीत, तर नेतृत्त्वही करत आहेत. भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) ही देशातील सर्वात प्रतिष्ठेची व जबाबदारीची सेवा मानली जाते, आणि या क्षेत्रात महिलांनी आपल्या धैर्य, बुद्धिमत्ता व संवेदनशीलतेच्या बळावर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कठीण परिस्थिती, कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने, दहशतवादविरोधी कारवाया, सामाजिक गुन्ह्यांवर नियंत्रण अशा प्रत्येक आघाडीवर महिला आयपीएस अधिकारी समर्थपणे उभ्या आहेत. त्यांनी सिद्ध केले आहे की, धैर्याला लिंगभेद नसतो आणि कर्तव्यनिष्ठेला सीमा नसते. कठोर निर्णयक्षमता आणि मानवी मूल्यांची जाण यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. आजच्या नव्या पिढीतील मुलींसाठी त्या प्रेरणास्थान बनल्या आहेत. स्वप्न मोठे बाळगा, परिश्रमाला पर्याय नाही आणि देशसेवा हीच सर्वोच्च साधना आहे, हा संदेश त्या आपल्या कर्तृत्वातून समाजात पोहचवत असतात. आजच्या या यशोगाथेत आपण अशाच जिद्दी, कर्तव्यदक्ष आणि प्रेरणादायी आयपीएस अधिकारी असलेल्या डॉ. संजुक्ता पराशर यांना अनुभवणार आहोत. ज्यांनी आपल्या कार्यातून राष्ट्राच्या सुरक्षेला नवे बळ दिले आहे.

धैर्य, बुद्धिमत्ता आणि कर्तव्यनिष्ठा यांचे तेजस्वी प्रतीक म्हणजे संजुक्ता पराशर. ही कथा आहे एका अशा धाडसी स्त्रीची, जिने संकटांना सामोरे जात न्याय, राष्ट्रनिष्ठा आणि मानवतेचा दीप सदैव प्रज्वलित ठेवला आहे. आसाममधील दहशतवादग्रस्त भागात जेव्हा भीतीचे सावट दाटून येते, तेव्हा एक नाव अतिरेक्यांच्या मनात थरकाप उडवते संजुक्ता पराशर. २००६ च्या आयपीएस बॅचमधील ही निर्भय अधिकारी केवळ बंदुकीच्या धैर्यावर नव्हे, तर प्रखर बुद्धिमत्ता, शिस्त आणि अटळ निर्धाराच्या बळावर दहशतवादाला आव्हान देत उभी राहिली. अवघ्या १५ महिन्यांत जवळ-पास १६ अतिरेक्यांना यमसदनी पाठविले तर ६४ अतिरेक्याविरुद्ध कारवाई करून आणि मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त करून त्यांनी कायद्याच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले. उच्च शिक्षण, खेळामधील प्रावीण्य आणि कठोर प्रशिक्षण यांचा संगम असलेल्या संजुक्ता या 'लेडी सिंघम' म्हणून ओळखल्या जातात; पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख म्हणजे नम्रता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी.





गुन्हेगारांनीच मला घाबरावे, असे ठामपणे सांगणाऱ्या या अधिकाऱ्यांनी कर्तव्य, साहस आणि संवेदनशीलता यांचा सुंदर मेळ




घालत महिला शक्तीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. ३ ऑक्टोबर १९७८ रोजी आसाममध्ये जन्मलेल्या संजुक्ता पराशर यांनी लहानपणापासूनच जिद्द, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांची ठोस पायाभरणी केली.त्यांची आई म्हणजे आसाम आरोग्य सेवांमध्ये काम करणाऱ्या मीना देवी आणि वडील दिब्रुगडमध्ये सिंचन विभागात अभियंता होते ते दुलाल चंद्र बरुआ. आई-वडील दोघेही उच्च शिक्षित व उच्च विचारसरणीचे. त्यानंतर त्यांचे कुटुंब लखीमपूरला गेले जिथे त्यांचे बालपणाची दोन वर्षे गेली आणि त्यानंतर गुवाहाटीला स्थलांतरित झाले. ते गुवाहाटी शहरात स्थलांतरित झाल्यानंतर संजुक्ता यांनी गुवाहाटीच्या होली चाइल्ड स्कूलमधून दहावी पूर्ण केली. त्यांना खेळात खूप रस होता. विद्यार्थी असताना, शाळेतील आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये मोठ्या उत्साहाने भाग घ्यायच्या. त्याचप्रमाणे एकांकिका स्पर्धेत सहभागी होणेही आवडायचे. एकंदर लहानपणा-पासूनच त्या सर्वगुणसंपन्न अशाच होत्या.

बंडखोरी आणि दहशतवादाने त्रस्त असलेल्या वातावरणात वाढताना त्यांनी भीतीला शरण न जाता परिस्थिती बदलण्याचा निर्धार केला. संघर्षमय वास्तवानेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला धार दिली आणि पुढे देशसेवेचा मार्ग निवडण्याची प्रेरणाही दिली, आणि त्यानुसार शैक्षणिक क्षेत्रात त्यांची वाटचाल तितकीच उल्लेखनीय ठरली. त्यांनी दिल्ली विद्यापीठ अंतर्गत इंद्रप्रस्थ महिला महाविद्यालयातून राज्यशास्त्र विषयात पदवी संपादन केली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय घडामोडींचे सखोल आकलन व्हावे या हेतूने त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ येथे आंतरराष्ट्रीय संबंध या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. याच विषयाचा अजून सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांनी एमफिलव पीएच.डी. देखील पूर्ण केली आहे. या शिक्षणप्रवासामुळे राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक-राजकीय प्रश्न आणि प्रशासन यांविषयी त्यांची समज अधिक परिपक्व झाली.

देशसेवेची ओढ मनात बाळगून त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या कठीण स्पर्धात्मक परीक्षेला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला. २००६ साली त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अखिल भारतीय क्रमांक ८५ मिळवला आणि भारतीय पोलीस सेवेत प्रवेश केला. यामध्ये निवड होणे ही केवळ वैयक्तिक यशाची बाब नव्हती, तर समाजासाठी कार्य करण्याच्या त्यांच्या ध्येयाची सुरुवात होती. त्यांना आसाम, मेघालय कॅडर मिळाले आणि त्यांचा संघर्षमय प्रवास प्रत्यक्षात सुरू झाला. २००८ मध्ये त्यांची पहिली पोस्टिंग आसाम पोलीस दलात माकुम येथे असिस्टंट कमांडट म्हणून झाली. तिथे रुजू झाल्यानंतर त्यांनी कठोर नेतृत्व, शिस्तबद्ध नियोजन आणि निडर कार्यपद्धतीमुळे लवकरच आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यावेळी त्यांनी विशेषतः बोडो अतिरेक्यांविरोधातील कारवायांमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्त्व दाखवले. दुर्गम जंगल परिसरात लपलेल्या अतिरेक्यांविरुद्ध त्यांनी समन्वयित मोहिमा राबवत मोठे यश मिळवले. त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अनेक अतिरेक्यांना निष्प्रभ केले आणि अनेकांना अटक केली. यामध्ये केवळ १५ महिन्यांत १६ अतिरेक्यांना ठार केले तर ६४ अतिरेक्यांना अटक केली. या मोहिमांनी आसाममधील सुरक्षाव्यवस्थेला नवी ताकद दिली.

संजुक्ता पराशर केवळ नियोजनापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत; त्या प्रत्यक्ष कारवाईत सहभागी होत आपल्या सहकाऱ्यांना प्रेरणा देत राहिल्या. संकटाच्या क्षणी शांतपणे आणि अचूक निर्णय घेण्याची त्यांची क्षमता त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते. त्यांच्या निर्भय वृत्तीमुळेच त्यांना आसामची आयर्न लेडी ही उपाधी मिळाली. कारकिर्दीत अनेकदा त्यांना धमक्या मिळाल्या, तरीही त्यांनी आपल्या ध्येयापासून पाऊल मागे घेतले नाही. त्यांच्या दृष्टीने राष्ट्रहित आणि जनतेची सुरक्षा हाच सर्वोच्च प्राधान्यक्रम राहिला. त्यांचे पती आयपीएस अधिकारी असलेले पुरू गुप्ता हे आहेत. हे दोघेही कठोर सेवेत असतानाही कुटुंबीय जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळतात. त्यांना एक मुलगा आहे.विशेषतः संजुक्ता यांनी अधिकारी आणि आई या दोन्ही भूमिका संतुलितपणे निभावल्या. यातून त्यांची संवेदनशीलता आणि दृढता दोन्ही प्रकर्षाने दिसून येते. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत भारताचे गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेबद्दल गृहमंत्री पदक प्रदान केले. हा सन्मान त्यांच्या निष्ठा, धैर्य आणि कर्तव्यपरायणतेची राष्ट्रीय पातळीवरील पावती होती. सध्या त्या राष्ट्रीय तपास संस्था दिल्ली येथे पोलीस महानिरीक्षक या पदावर कार्यरत आहेत.

संजुक्ता पराशर यांची कथा ही केवळ एका पोलीस अधिकाऱ्याची यशोगाथा नाही; तर ती आहे स्त्रीशक्ती, जिद्द आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी सिद्ध केले की धैर्य, समर्पण आणि प्रामाणिक हेतू असतील, तर कोणतेही आव्हान मोठे नसते. आज त्या केवळ तरुण आयपीएस इच्छुकांसाठीच नव्हे, तर प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणास्त्रोत ठरल्या आहेत. त्यांच्या कार्याचा ठसा आसामच्या भूमीवर आणि देशाच्या सुरक्षाव्यवस्थेवर कायमस्वरूपी उमटलेला आहे. अढळ निर्धाराची साक्ष देणारी प्रेरणादायी अशी ही यशोगाथा..

**-डॉ. दीपाली चंद्रकांत पांडे**
पु. अ. होळकर महाविद्यालय राणी सावरगाव

# भाषेचा सन्मान व्हायलाच हवा

जगातील प्रत्येक देशाची मातृभाषा ही ईश्वरी देण आहे, त्यामुळे त्याचा सन्मान व्हायलाच हवा. जगात कुठेही जा, परंतु मातृभाषेला विसरू नका. कारण इंग्रजी भाषेमुळे जगातील २३५० भाषा मरणपंथाला लागल्या आहेत. तर काही भाषांचे अस्तित्व पूर्णतः पुसले गेले आहे. यामध्ये उत्तर मध्य अमेरिका २२२, दक्षिण अमेरिका २२६, युरोप/रशिया १४८, आशिया ६९३, आफ्रिका ४२८, ओशियाना ७३३ इत्यादी खंडामध्ये अशी मातृभाषेची गंभीर परिस्थिती असल्याचा उल्लेख जागतिक भाषा समितीच्या निष्कर्षात केला आहे. त्यामुळे प्रत्येक खंडाने व देशांनी आपली मातृभाषा वाचविण्यासाठी कटिबद्ध असायला हवे. आज प्रत्येक देशात मातृभाषेला महत्व आहे. त्याचप्रमाणे भारतात सुध्दा प्रत्येक राज्यात मातृभाषेला तेवढेच महत्त्व आहे आणि असायलाच पाहिजे. मातृभाषा शिकविली जात नसून जन्मताच अवगत असते याला ईश्वरी देण सुध्दा म्हणता येईल. त्यामुळे जगातील कोणताही व्यक्ती असो त्याला आपल्या मातृभाषेचा गर्व आणि अभिमान असणे सहाजिकच आहे.जगामध्ये प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचे महत्व कळावे या उद्देशाने नोव्हेंबर १९९९ मध्ये यूनेस्को येथे आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण २१ फेब्रुवारी १९५२ मध्ये ढाका युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तत्कालीन पाकिस्तान सरकारच्या भाषा नितीचा विरोध केला होता. कारण त्यांना आपल्या मातृभाषेचे अस्तित्व टिकवून ठेवायचे होते.

प्रदर्शनकारी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी होती की, बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा मिळावा. परंतु अशा परीस्थितीत पाकिस्तान पोलिसाने प्रदर्शनकारी विद्यार्थ्यांवर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला.परंतु विरोध थांबला नाही. अंततः पाकिस्तान सरकारला बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा द्यावा लागला. मातृभाषेच्या आंदोलनादरम्यान शहीद झालेल्या युवकांना श्रध्दांजली देण्यासाठी यूनेस्कोने नोव्हेंबर १९९९ ला जनरल कांफ्रेंसमध्ये आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला व २१ फेब्रुवारी ही तारीख ठरविण्यात आली. तेव्हापासून संपूर्ण जगात २१ फेब्रुवारी हा



आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केला जाऊ लागला. संयुक्त राष्ट्रानुसार जगात बोलल्या जाणाऱ्या एकूण भाषा साधारणतः ६९०० आहेत. यात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या १० भाषेमध्ये जापानी, इंग्रजी, रूसी, बांग्ला, पुर्तगाली, अरबी, पंजाबी, मंदारिन, हिंदी आणि स्पेनिश इत्यादी आहेत.

भारताचा विचार केला तर मातृभाषेला आगळे वेगळे महत्व दिसून येते. भारतात प्रत्येक ४० किलोमिटर नंतर आपल्याला भाषा बदलताना दिसते. ज्याप्रमाणे म्हटल्या जाते, कोस-कोस पर पाणी बदले, चार कोस पर वाणी याप्रमाणे भारतात मातृभाषा बदलताना दिसते. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी जरी असली तरी प्रत्येक ४० कीलोमीटर नंतर लोकांच्या रहनीमानासह भाषांमध्ये संस्कृतीमध्ये आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचा गोडवा पहायला मिळतो. भाषेचा विचार केला तर भारताची भाषा व संस्कृती ही जगावेगळी असल्याचे दिसून येते.

भारतात अनेक जातींचे, पंथाचे, धर्माचे लोक राहतात. भारतात २८ राज्य व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत.त्यामुळे भारतातील प्रत्येक राज्याची मातृभाषा वेगळी आहे. त्यातही प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक ४० किलोमीटरच्या अंतरावर भाषेचा वेगळा गोडवा दिसून येतो. भारतात हिंदी दिल की धडकन तो मातृभाषा दिलं की आवाज या पद्धतीने मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा सन्मान केल्या जातो. वल्ड लँग्वेज डेटाबेसनुसार २२ व्या संस्करण इथोनोलॉजच्यानुसार जगातील २० सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये हिंदी ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची भाषा मानली जाते. ज्याप्रमाणे मातृत्व आणि पितृत्व महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक देशाची मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषा महत्त्वाची असल्याचे मी समजतो. जगात अनेक भाषांचे भंडार आहेत यात दुमत नाही. त्या संपूर्ण भाषा अवगत केल्याही पाहिजे यामुळे ज्ञानाचा भांडार वाढतो. परंतु त्या भाषेच्या आड मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. आजही भारतात इंग्रजी भाषेला जास्त महत्व दिले जाते. भारतातील नामांकित व्यक्ती किंवा हायप्रोफाइलमध्ये राहणारी व्यक्तीसुध्दा इंग्रजी भाषेला महत्व देवून मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेला विसरताना दिसतात. याला सरकारने कोठेतरी थांबविले पाहिजे. यामुळे मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा अपमान होतो. जगातील कोणताही देश असो प्रत्येकाची मातृभाषा म्हणजे पूर्वजांचा एक ठेवाच आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोणतेही कार्य करतांना किंवा बोलताना मातृभाषेला प्रथम स्थान द्यायला पाहिजे.

प्रत्येकांची मातृभाषा ही त्या-त्या संस्कृतीनुसार अवगत असते.त्यामुळे आपण जर बाहेर निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर नंतर आपल्याला प्रत्येक भाषेत थोडा-थोडा बदल झालेला दिसतो. सांगायचे तात्पर्य की, देशात किंवा जगात कुठेही जावे, परंतु मातृभाषेचा विसर पडणार नाही याची काळजी सर्वांनीच जातीने घेतली पाहिजे. जगातील संपूर्ण भाषेचा व संस्कृतीचा अभ्यास करायलाच पाहिजे. परंतु आपल्या संस्कृतीला किंवा मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी सुध्दा घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत आपण पहातो आई-बाबा, काका-काकू, मामा-मामी, आजी-आजोबा इत्यादी अनेक जुन्या शब्दांना विसरून मम्मी, डॅडी, पप्पा, मॉम, अन्टी, ग्रॅनफादर इत्यादी अनेक इंग्रजी शब्दांचा वापर होतांना आपण पहातो. त्याचप्रमाणे मामी-मामा, काका -काकु, माऊशी-माऊसाजी या शब्दाला आगळे-वेगळे महत्त्व आहे. कारण यातूनच नात्याची वेगवेगळ्या पध्दतीने ओळख दिसून येते. परंतु आता या नावाचे महत्व विसरून या सर्वांना अन्टी व अंकलमध्ये परीवर्तीत केल्याचे दिसून येते. यामुळे खरे नाते कोणते हे कळतच नाही. याचा परिणाम मातृभाषेवर होऊ शकतो याला नाकारता येत नाही.

भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत. हासुद्धा भारताचा इतिहासच आहे प्रत्येकाने जर आपल्या मातृभाषेचा वापर केला तर भारतातील प्रत्येक व्यक्तीला अनेक भाषा आपोआपच अवगत होतील व सर्वांजवळ मोठ्या प्रमाणात भाषेचे भंडार आपोआप निर्माण होईल. यामुळे प्रत्येकाचे भाषेचे ज्ञान मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत होईल.

भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की, लोकसभेत किंवा राज्यसभेत काही सांसद मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषा (हिंदीचा) वापर न करता इंग्रजी भाषेचा वापर करतात. यावर आंतरराष्ट्रीय मातृभाषेच्या निमित्ताने अंकुश लावण्याची गरज आहे. कारण अनेक देशांत आताही त्यांच्याच देशातील भाषा बोलल्या जाते. उदाहरण द्यायचे झाले तर जापान, चीन, स्पेन, अरबी, रशिया, जर्मनी, इस्त्रायल इत्यादी अनेक. त्यामुळे भारतातील प्रत्येक भाषेला महत्व देण्याची आवश्यकता आहे. इंग्रजी भाषेऐवजी मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषेचा उपयोग जास्तीत जास्त केला तर येणारी पिढी याचे स्वागतच करेल.आंतराष्ट्रीय मातृभाषा दिनाचे औचित्य साधून जगातील संपूर्ण देशांनी निसर्गाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. भूकंप व वाढत्या तापमानामुळे समुद्राची पातळी वाढणे यामुळे पृथ्वी-मातेचे संतुलन डगमगत आहे. याकरिता सर्वांनीच वृक्ष लागवडीचा संकल्प घ्यायला हवा. कारण आज ज्याप्रमाणे गरज आहे मातृभाषेच्या रक्षणाची त्याचप्रमाणे पृथ्वी ही सर्वांचीच माता आहे. तिला वाचविण्यासाठी भारतासह जगभरातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षारोपण होणे अत्यंत गरजेचे आहे.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९,

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची पुण्यतिथी आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज



यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फुर्ती निर्माण केली.

आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फुर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# विष्णुपुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक सोहळा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** विष्णुपुरी येथे शिवजन्मोत्सव निमित्ताने सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने पालखी सोहळा ढोल ताशांच्या गजरात व भजनी मंडळ, लेक्षीम सादरीकरण करत उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त गावातील मुख्य रस्त्याने मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी माजी आमदार मोहनराव हंबर्डे, सरपंच सौ. संध्या हंबर्डे यांच्यासह पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

१९ फेब्रुवारी रोजी विष्णुपुरी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवाजी पार्क ते गावातील प्रमुख रस्त्याने पालखी मिरवणूक सोहळा पार पडला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास विधीवत पूजन करून महाआरती करण्यात आल्यानंतर माजी आमदार मोहनराव हंबर्डे, सरपंच सौ. संध्या हंबर्डे, उपसरपंच अर्चना हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, ज्येष्ठ नागरिक धारोजी हंबर्डे व जयंती मंडळ अध्यक्ष सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, उपाध्यक्ष शिवाजी हंबर्डे, गावातील महिला मंडळ यांच्यासह युवक, नागरिक यांच्या उपस्थितीत पालखी मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूक गावातील काळेश्वर कमान, दवाखाना, मुख्य रस्त्याने अंजनी नगर, दत्त मंदिर, दुर्ग वाडा, मारोती मंदिर, नृसिंह मंदिर मुख्य मार्गाने निघून शिवाजी पार्क येथे विसर्जित करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी लेझीम सादरीकरण तर गावातील नृसिंह व खंडोबा भजनी मंडळाने सहभाग नोंदविला होता. या मिरवणुकीमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, माजी सरपंच संतोष बारसे, सचिन हंबर्डे, रामचंद्र शेंबोले, शहाजी हंबर्डे, शिवाजी हंबर्डे, विलास भोसले, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे, चंद्रकांत हंबर्डे, माधव भारती, बालाजी हंबर्डे यांच्यासह गावातील विविध राजकीय पक्षांच्ये पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड- देगलूर ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्गाला गती; जोडमार्गासह प्रकल्प मार्गस्थ

## खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या पाठपुराव्याला यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** इंदोर-अकोला-नांदेड-हैदराबाद या महत्त्वपूर्ण द्रुतगती महामार्ग साखळीतील नांदेड – देगलूर ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग प्रकल्पाला निर्णायक गती मिळाली आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण मार्फत एल. एन. मालवीय इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला प्रदान करण्यात आले आहे. यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यशस्वी पाठपुरावा केला आहे.

प्रस्तावित नांदेड – देगलूर ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग हा जालना-नांदेड द्रुतगती मार्गाशी जोडणाऱ्या स्वतंत्र जोडमार्गासह विकसित करण्यात येणार असून, मराठवाडा तसेच सीमा भागातील दळणवळण सुलभ होण्याबरोबरच औद्योगिक गुंतवणूक, व्यापारवृद्धी आणि प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेषतः नांदेड जिल्ह्यातील देगलूर, मुखेड, भोकर तसेच सीमावर्ती ग्रामीण भागांना मोठ्या शहरांशी थेट व जलद संपर्क मिळणार असल्याने कृषी उत्पादनांची बाजारपेठ वाढणे, लघुउद्योग व सेवा व्यवसायांना संधी मिळणे, पर्यटन आणि शैक्षणिक हालचाली सुलभ होणे तसेच रोजगारनिर्मितीला चालना मिळणे असे बहुआयामी लाभ या प्रकल्पातून अपेक्षित आहेत.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध टप्प्यांवर निवेदने सादर करणे, प्रत्यक्ष भेटी घेणे तसेच प्रकल्पाच्या तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रियेबाबत पाठपुरावा करणे अशा माध्यमांतून त्यांनी हा विषय केंद्र व राज्य शासनाच्या पातळीवर प्रभावीपणे मांडला होता. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रक्रियेला प्रारंभ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

नांदेड – देगलूर द्रुतगती ग्रीनफिल्ड महामार्ग साकार झाल्या नंतर इंदोर-अकोला-नांदेड-हैदराबाद या महामार्ग साखळीला बळकटी मिळणार असून, प्रवासाचा कालावधी कमी होणे, मालवाहतूक सुलभ होणे आणि सीमा भागातील सामाजिक-आर्थिक विकासाला नवे आयाम मिळणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त करत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार मानले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज यांना योगिक दौड करून अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी) –**नित्य योग सेवा समिती नांदेडच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त योगिक दौड करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले.

पतंजली योगपीठ हरिद्वारनंतर भारतात नंबर एक ठरलेल्या नित्य योग सेवा समितीच्या माध्यमातून योगाचार्य सिताराम सोनटक्के गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती चौक पूर्णा रोड ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापर्यंत असंख्य योग साधकांनी योगिक दौड करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

याप्रसंगी योगाचार्य सिताराम सोनटक्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. आयोजित योगिक दौड उपक्रमात योगाचार्य सिताराम सोनटक्के यांच्यासह श्रीराम जनकवाडे, ॲड. ज्ञानेश्वर कवळे, नायब तहसीलदार दिगलवाड, पंकज आयनेले, बाळकृष्ण पसलवाड, किशन घोलप, मकरंद पांगरकर, ओम पांचाळ, डॉ. नावंदीकर, सोपान कदम, पंकज चव्हाण, विनायक बाराहत्ते, बाळू धुमाळ पाटील, किरण मुत्तेपवार, गिरोड, सौ. रंजना सोनटक्के, सौ. विद्या कोकरे, सौ. शीला मेंडके, सौ. रेखा धूत यांच्यासह अनेक योग साधक व साधिकांनी सहभाग नोंदविला.

# प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने व्याख्यान व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी समाज जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर 'प्रा. सुग्राम पुल्ले व्याख्यानमाला' आयोजित केली जाते. व्याख्यानमालेचे हे तिसरे वर्ष आहे. या व्याखानमालेत डॉ. राजशेखर सोलापुरे व डॉ. रामकृष्ण बदने यांनी आपले विचारमंथन मांडले. यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांचे 'जगण्यातील आनंदाच्या वाटा' या विषयावर बहुमोल व्याख्यान होणार आहे.

तसेच प्रा. सुग्राम पुल्ले स्मृती प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती करणाऱ्या एका साहित्यिकाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. गतवर्षी हा पुरस्कार 'उसवण' या कादंबरीचे लेखक देवीदास सौदागर यांना प्रदान करण्यात आला होता.

या वर्षीचा मराठी साहित्य विश्वातील अत्यंत महत्त्वाच्या 'प्रा. सुग्राम पुल्ले राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारा'साठी डॉ. नागनाथ पाटील यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. नागनाथ पाटील यांचे लंबाडी, कोंडणातलं जिणं, हुतराणी या कादंबऱ्या आणि रानभूल, मॅपको हे कथासंग्रह तर खोल डोहातल्या सावल्या, सावली हरवलेले झाड हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. डॉ. नागनाथ पाटील यांना हा पुरस्कार (रोख रक्कम रु. ५००१ /-, मानपत्र व शाल इ.) सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

हा सोहळा रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:०० वाजता सायन्स कॉलेज, नांदेड येथील स्व. पुरणमलजी लाहोटी सभागृहामध्ये होणार आहे.

# शिवजयंतीनिमित्त बाभुळगाव ग्रामस्थांनी काढली मिरवणूक



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सार्वजनिक नवयुवक शिव-जन्मोत्सव समितीच्या वतीने बाभुळगाव ते हडको, सिडको परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्र व पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी व पारंपरिक वाद्यवृंदांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

प्रथमच यावर्षी नवयुवक सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती बाभुळगावच्या वतीने गावातील आश्वरूढ पुतळ्यास अभिवादन करून ढोल ताशांच्या गजरात पालखी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राची मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्याने काढण्यात आली. यावेळी आकर्षक व सिंहासनावर बसलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याने शिवभक्तांचे लक्ष वेधून घेतले.

सरपंच पुंडलिक मस्के, दीपक मस्के, सचिन मस्के, काळेश्वर मस्के, चक्रधर मोरे, राम मोरे, जयदत मोरे, संदीप मस्के, गोविंद मोरे, राजेश मोरे, आनंदा राजुरे, दत्ता बोडके यांच्यासह युवक, ज्येष्ठ नागरिकांचा या मिरवणुकीत सहभाग होता.

हडको येथील गोविंद गार्डन मार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळा हडको, सिडको येथील अण्णाभाऊ साठे पुतळा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक सिडको येथे पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी





**नांदेड (प्रतिनिधी)–** रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नांदेड जिल्ह्यातील विविध संस्थेत, शाळा, महाविद्यालयात विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली.

**स्वारातीम विद्यापीठ**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध्याकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, सहा. कुलसचिव रामदास पेद्देवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, संदीप लुटे, जालिंदर गायकवाड, संभाजी धनमने व गोपिराज हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध्याकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**डाकघर कार्यालय नांदेड**

येथील मुख्य डाकघर कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सहायक डाक अधीक्षक (मुख्यालय) विनोद कुलकर्णी, सहायक अधीक्षक अरुण गायकवाड, मुख्य डाकपाल दादाराव बुक्तारे, उप डाकपाल विजय कऱ्हाळे, मुंजा गायकवाड, सहायक डाकपाल सय्यद निसार अली, हरिश्चन्द्र कदम, एन. एन. वाडीकर, डाक सहायक निलेश भोसीकर, विजय मुळके, नागनाथ थळंगे, प्रवीण बडवणे, आर. डी. परसे, एस. पी. मोकळे, मुकुंद वानरे, गणेश भुसोड चिमणाजी साखरे, इतर अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

**हिवताप कार्यालय, नांदेड**

रयतेचे राजे, अखंड हिंदुस्थानचे जनक, आराध्य दैवत, जाणता राजा श्रीमंतयोगी, हिंदवी स्वराज्य संस्थापक श्री श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती गुरूवारी जिल्हा हिवताप कार्यालय नांदेड येथे साजरी करण्यात आली.

यावेळी जिल्हा हिवताप कार्यालयाचे कार्यालयीन प्रमुख कैलास सावळे, आरोग्य पर्यवेक्षक गंगाधर गन्लेवार, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विलास चाटे, आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार, माधव कोल्हे, लिपिक अशोक हरणालीकर, दिलीप राठोड, सुरेश पिंपळगावकर, वाहन चालक, मुकुंद देवकांबळे मामा, पद्माकर मोळके, परमेश्वर स्वामी मठदेवरु, शेख खलील कर्मचारी उपस्थित होते.

**मॉर्निंग क्रिकेट क्लब व बॉल बॅडमिंटन ग्रुपच्या वतीने शिवजयंती साजरी**

**नांदेड –** शहरातील भगीरथ नगर येथील मैदानावर मॉर्निंग क्रिकेट क्लब व बॉल बॅडमिंटन ग्रुपच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. सर्व खेळाडूंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून 'जय भवानी जय शिवाजी'च्या घोषणा दिल्या. तसेच मिठाई वाटप केली.

यावेळी खेळाडू उत्तम वाठोरे, डॉ. माधव लोकडे, प्रा. भाऊसाहेब वानखेडे, अशोक खेडकर, गजानन चव्हाण, प्रेसित मद्रप, आशुतोष सरसे, गोविंद पवार, संतोष किलेकर, सुनील वाघमारे, सुरेश काशिदे, दत्ता साखरे, बाबाराव काळे, सचिन कांबळे आदींसह अन्य खेळाडू उपस्थित होते. तर सायंकाळी मॉर्निंग क्रिकेट क्लबच्या वतीने वर्कशॉप कॉर्नर येथे शिवप्रेमींना अन्नदान वाटप करण्यात आले.

**श्री दत्तप्रभू प्रा. व उच्च मा. शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी**

गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी श्री दत्तप्रभू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी महाराजांच्या कार्याविषयी महत्त्वाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यानंतर काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात काही विद्यार्थी माँ जिजाऊ व शिवरायांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. अशा विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. आगलावे आर. पी. यांनी केले, तर आभार सौ. पापुलवार एस. एन. यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. हिवराळे एस. डी., नागरगोजे पी. जी., गायकवाड ए. एस., सावंत पी. बी., काळे जी. एस. यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास परिसरातील पालक, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भोकर ग्रामीण रुग्णालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी**

**भोकर (प्रतिनिधी)–** येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये 'रयतेचे राजे' छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाचे आणि त्यांच्या लोककल्याणकारी स्वराज्याचे स्मरण केले. रुग्णांची सेवा करताना महाराजांच्या रयत प्रथम या विचाराने कार्य करण्याची प्रेरणा मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता भालके, सहाय्यक अधीक्षक संजय देशमुख, लिपीक प्रल्हादअप्पा होळगे, अधिपरिचारिका श्रीमती साधना भगत, संगीता ताटेवार, कठारे मामा, प्रकाश सर्जे, वाहन चालक रवी वाठोरे, आरकेएसके समुपदेशक सुरेश डुम्मलवाड, श्रीमती तुळजा पवार, काळे, गंगाधर शिंदे आणि सुरक्षारक्षक संदीप यांच्यासह ग्रामीण रुग्णालय भोकर येथील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रुग्णालया-तील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शिवजयंतीनिमित्त रुग्णालय परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

**मॉर्निंग वॉक ग्रुपच्यावतीने शिवजयंती उत्साहात साजरी**

**बरबडा (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील बरबडा, पाटोदा शिवारात असलेल्या इच्छापूर्ती काळा मारुती मंदिर परिसरात मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत भक्तिभावाने व जल्लोषात साजरी करण्यात आली.







# तंत्रमंत्र


विज्ञानयुगातील बितंबातम्या

## Petabyte काय आहे?

बाइट, मेगाबाइट आणि गीगाबाइटबाबत तुम्ही अनेकदा ऐकले असेल. हे शब्द ऐकले नसतील तर MB आणि GB ही नावं तर नक्कीच ऐकली असतील. कोणत्याही स्वरुपातील डेटा मोजण्यासाठी एमबी आणि जीबीचा वापर केला जातो. हे बेसिक यूनिट बाइट असते. जसे अंतर मोजण्यासाठी मीटर, किलोमीटर आणि मैल हे परिमाण वापरले जाते. त्याचप्रकारे डेटा अथवा स्टोरेजसाठी बाइट, मेगाबाइट आणि गीगाबाइट याचा वापर केला जातो. फोनमधील फोटो, व्हिडिओचे स्टोरेज किती आहे, हे आपण एमबी, जीबी यामध्येच मोजतो. अशाप्रकारेच, मनुष्याच्या मेंदूमध्ये असंख्य गोष्टी स्टोर असतात. विचार करा या किती जीबीच्या असतील? या प्रश्नाचे उत्तर जाणून घेऊया... पेटाबाइट हे डेटाचे एक यूनिट आहे. सध्या हा शब्द विशेष चर्चेत आहे. हा डेटा स्टोर करण्याचे एक मापक आहे. एक पेटाबाइट डेटा स्टोर करण्यासाठी तब्बल ७४.५ कोटींपेक्षा अधिक फ्लॉपी डिस्कची गरज पडेल. तुम्ही या डेटाला १५ लाख CD ROM डिस्कमध्ये स्टोर करू शकता. या दोन्ही पद्धती पेटाबाइटला स्टोर करण्यासाठी सोप्या नाहीत. परंतु, यावरून हा डेटा किती जास्त असू शकतो, हे लक्षात येते. तुम्ही अवतार या चित्रपटाबाबत देखील ऐकले असेल. या चित्रपटात ग्राफिक्सचा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. या चित्रपटाच्या ग्राफिक्सला रेंडर करण्यासाठी १PB स्टोरेजची गरज पडली होती. रिपोर्टनुसार, मनुष्याच्या मेंदूमध्ये २.५ PB म्हणजेच २.५ पेटाबाइट मेमरी असते. एवढ्या स्टोरेजसाठी तुम्हाला सलग ३.४ वर्ष Full HD रेकॉर्डिंग करावे लागेल.

# गुगल फुकटात सेवा का देतं?

**एकापाठोपाठ एक गुगल नवनवीन तंत्रज्ञान सादर करीत आहे. मात्र, गुगलने हे तंत्रज्ञान आपल्याला दिले कसे, ही सेवा 'चकटफू' का दिली, गुगल नेमके कसे काम करते आदी प्रश्नांची उत्तरे देण्याचा हा प्रयत्न...**



गुगलच्या वतीने सादर करण्यात आलेली नवीन उत्पादने डेटावर आधारित आहेत. गुगलच्या माध्यमातून दररोज कोट्यवधी लोकांचा डेटा गोळा केला जातो. या डेटाच्या आधारावरच ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत. आजच्या घडीला गुगलच्या विविध सेवांचा उपयोग करणाऱ्यांना हेच माहीत नाही की, त्यांच्या अनेक संवदनशाल बाबी अथवा गोष्टी गुगलच्या नजरेतून सुटलेल्या नाहीत. अनेक माध्यमांतून गुगलद्वारा संबंधित यूजरची माहिती गोळा करण्याची कामे सुरूच असतात. बहुतांश लोकांना त्यांच्या गोपनीय माहितीची चोरी झाली तरी फारसा फरक पडत नाही. सध्या गुगलची एकूण सात उत्पादने कार्यरत असून, प्रत्येक उत्पादनाचे अंदाजे एक अब्ज सक्रिय यूजर आहेत. या सातपैकी कोणतेही उत्पादन यूजरच्या डेटाशिवाय चालूच शकत नाही. त्यामुळे यूजरच्या डेटावर ताबा मिळवूनच गुगलची उत्पादने साकारण्यात येतात.

## माहिती गुगलकडे येते कशी?

आपल्या अर्थात यूजरच्या सर्व माहितीचा उपयोग करून गुगल आपल्यावर नवनव्या उत्पादनांचा भडिमार करीत असते. त्यामुळे आपली वैयक्तिक माहिती गुगलकडे नेमकी जाते कशी, असा प्रश्न अनेकांना पडलेला असतो. खरं, सांगायच तर ही माहिती आपणचं स्वतःहून गुगलच्या स्वाधीन करीत असतो. विश्वास बसत नाहीये का? खरंच ही माहिती आपणच गुगलच्या स्वाधीन करीत असतो. तुम्ही गुगलची जितकी उत्पादने वापरता तितकी तुमची माहिती फुटते. मग, जी-मेलचा वापर असो, तुमच्या मोबाइलची ऑपरेटिंग सिस्टीम अँड्रॉइड असो, तुम्ही यू-ट्यूब, गुगल ड्राइव्ह, गुगल मॅप किंवा गुगल सर्चचा वापर करीत असाल, तर तुमची माहिती सहजरित्या गुगलकडे हस्तांतर होण्यास सुरुवात होते. या सर्व माध्यमातून गुगलतर्फे तुमचा वैयक्तिक डेटा गोळा केला जातो. इतकेच नव्हे तर, गुगलतर्फे तुमचा ई-मेलही स्कॅन केला जातो. ई-मेलचे स्कॅनिंग करून त्यातील की-वर्ड प्राप्त केले जातात. या की-वर्डच्या माध्यमातून संबंधिताला तशाप्रकारच्या जाहिराती पाठविल्या जातात. त्यामुळे यापुढे गुगलच्या सर्वच उत्पादनांचा वापर करताना, गरजेपुरताच करणे आवश्यक आहे. जेणेकरून यूजरची वैयक्तिक माहिती चोरीही होणार नाही आणि त्याचा गैरवापरही होणार नाही.

## फेसबुकच्या तुलनेत नऊपट डेटा

गुगलकडे यूजरचा नेमका किती डेटा आहे, याची माहिती समजल्यानंतर तुम्ही नक्कीच हैराण व्हाल... माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सल्लागार डायलन क्युरन यांच्या मते त्यांनी जेव्हा आपल्या फेसबुकचा सर्व डाटा डाउनलोड केल्यानंतर त्या फाइलचा आकार सहाशे मेगाबाइट इतका भरला. मात्र, त्याचप्रकारे गुगलचा डेटा डाउनलोड केला असता, तो डेटा ५.५ गिगाबाइट अर्थात जीबी इतका असल्याचे आढळून आला. याचाच अर्थ 'फेसबुक'च्या तुलनेत जवळपास नऊपट अधिक...जरा विचार करा...जर कुणी तिऱ्हाईत व्यक्ती आपल्या घरात डोकावत असेल, कॅमेरा लावून आपल्यावर नजर ठेवत असेल तर आपल्याला किती राग येतो. हेच कशाला सरकारने जरी आपली वैयक्तिक माहिती विचारली तरी आपली चिडचिड होते. मात्र, गुगलच्या बाबतीत आपण आपली वैयक्तिक माहिती सढळ हाताने त्यांच्या स्वाधीन करतो. ही माहिती स्वतःहून आपण गुगलच्या हाती देऊन आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करतो.

### उत्पादने चकटफू; कमाई कोट्यवधींची

गुगलतर्फे बहुतेक सर्व उत्पादने मोफत दिली जात असली तरी, त्यातून मिळणारे उत्पन्न मात्र बरेच मोठे आहे. या उत्पादनांचा वापरही मोठ्या प्रमाणात आहे. गुगलतर्फे यूजरचे ठिकाण आणि आवड लक्षात घेता त्याच्यावर जाहिरातींचा भडिमार केला जातो. जाहिराती देणाऱ्या कंपन्यांकडून मात्र मोठ्या प्रमाणात महसूल वसूल केला जातो.

### गुगलकडून माहिती विक्री?

गुगलची सर्वप्रकारची सेवा घेणाऱ्यांना आपली माहिती सर्वांसमोर उघड होईल का, याची भीती सातत्याने वाटत असते. आपली माहिती गुगलतर्फे विक्री होते की नाही, याची चिंता त्यांना सतावत असते. गुगलच्या प्रायव्हसी पॉलिसीनुसार कंपनीतर्फे ग्राहकाच्या डेटाचा उपयोग सेवा देण्यासाठी किंवा सेवेमध्ये भर घालण्यासाठी केला जातो. शिवाय डेटाचा उपयोग सेवेमध्ये वृद्धी करण्यासाठी किंवा सेवेचा दर्जा राखण्यासाठी केला जात असल्याचे म्हटले आहे. या शिवाय या डेटाचा उपयोग संबंधिताने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी किंवा आणखी सखोल माहिती देण्यासाठी केला जात असल्याचेही कंपनीतर्फे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गुगलची विश्वासार्हता नेमकी किती, यावरही आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

### यूजर काय करू शकतात?

अशाप्रकारे गुगलकडून डेटाची चोरी होत असेल तर यूजरनी 'गुगल'चा ऑनलाइन डॅशबोर्ड पाहण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार जाहिरातींचे सेटिंग बदलून आपल्याला हव्या असलेल्या जाहिराती पाहता येतात. या माध्यमातून नको असलेल्या जाहिराती काढून टाकता येतात. या शिवाय यूजर आपला जिओलोकेशन डेटाही नाहीसा करू शकतो. या माध्यमातून गुगल तुमच्या हालचालीवरही लक्ष ठेवू शकते.

### गुगल डेटाचे काय करणार?

या सर्व डेटाचोरीच्या पार्श्वभूमीवर या डेटाचे गुगल भविष्यात काय करणार, हा प्रश्न राहतोच. सर्वांत महत्त्वाचे येनकेनप्रकारेन मिळणारा डेटा गुगलसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. सध्या हा डेटा कंपन्यांना विकूनही गुगल मोठ्या प्रमाणात पैसे कमावत आहे. या डेटाला 'आर्टिफिशियल इंटलिजन्स'ची (Artificial Intelligence) जोड देऊन मोठ्या प्रमाणात पैसे कमावण्याची शक्यता नाकारता येत नाही. यूजरचा थोड्या प्रमाणात का होईना फायदा होत असला तरी, कंपनीकडे मोठ्या प्रमाणात डेटा जमा होत आहे. या डेटाचा उपयोग अन्यत्र होण्याची शक्यता आहे. जोपर्यंत या डेटाचा उपयोग चुकीच्या कामांसाठी होत नाही, तोवर ही बाब यूजरसाठी खचितच चांगली आहे. मात्र, डेटाचा उपयोग व्यावसायिक कामांसाठी केल्यास ती यूजरसाठी मोठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

**इंटरनेट वापरणाऱ्या सगळ्यांनाच गुगलचा वापर करावा लागतो. गुगल असिस्टंटच्या मदतीने व्हॉईस कमांड्स देऊन अलार्म सेट करणं, हवामानाचा अंदाज घेणं किंवा घरातली इतर उपकरणं हाताळणं यासारखी कामंही करता येतात. हे सगळं करत असताना डाटाच्या खासगीपणाचा प्रश्न ऐरणीवर येतो. कारण, आपण दिलेल्या सर्व कमांड्सचं रेकॉर्डिंग गुगल ठेवत असतं.**




गुगलनं स्टोअर करून ठेवलेल्या कमांड्स सर्व्हरवर साठवून ठेवलेल्या असतात. त्या नंतरही ऐकता येतात. शिवाय गुगलनं कमांड्सवर काय प्रतिक्रिया दिल्या याचं सुद्धा रेकॉर्डिंग केलेलं असतं. ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवेत आवश्यक ते बदल करता यावेत यासाठी हा डाटा सेव्ह केला जातो, असं गुगलचं म्हणणं आहे. असं असलं तरी गुगल असिस्टंटवरील हिस्ट्री डिलिट करण्याचा पर्यायही युजर्सकडे उपलब्ध आहे. आपल्या आवाजात सेव्ह असलेल्या कमांड्स अशा प्रकारे डिलीट करता येतात...




# गुगलकडे सेव्ह आहे तुमचा आवाज... असा करा डिलीट..!

### वेब ब्राउजरसाठी

- कम्पुटरवर वेब ब्राउजर ओपन करा आणि 'myactivity.google.com' वर जा.
- स्क्रीनच्या (उजव्या) बाजूला 'Delete Activity by' यावर क्लिक करा.
- इथे किती दिवसांपूर्वीच्या एक्टिव्हिटीज डिलीट करायच्या आहेत त्याची निवड करतो येते; शिवाय 'All time' हा पर्याय वापरून सगळ्या एक्टिव्हिटीजही डिलीट करता येतात.
- ड्रॉप डाउन मेन्यूमध्ये जाऊन 'Voice and audio' हा पर्याय निवडा.
- या नंतर पॉप-अप मेन्यू येईल; तिथे 'Delete' हा पर्याय निवडा.

### स्मार्टफोनसाठी...

गुगल ॲप उघडल्यावर स्क्रीनच्या खाली असणाऱ्या 'more' या पर्यायावर टॅप करा. 'search activity' वर टॅप करा. यामुळे तुम्ही 'myactivity.google.com' वर जाल. डाव्या बाजूला वरती तीन रेषा असलेल्या पर्यायावर टॅप करा आणि 'Delete Activity by' हा पर्याय निवडा. वेब ब्राउजरप्रमाणे इथेही 'voice and audio' हा पर्याय दिसेल. 'Delete' हा पर्याय निवडा.



कामाचा वाढता व्याप, स्क्रीन टाइममध्ये झालेली वाढ यासह ताणतणाव, नैराश्य अशा असंख्य समस्यांचा सामना लोक करत आहेत. यामुळे त्यांच्या शरीरावर परिणाम होत आहे. अनेकांच्या निद्राचक्रावर त्याचा प्रत्यक्ष परिणाम होत आहे. लोकांना शांत झोप लागावी यासाठी विविध उपकरणांची मदत घ्यावी लागत आहे. काहीजण यासाठी विशिष्ट ट्रिक्स वापरत आहेत.

# रात्री झोपताना Earplugs वापरणे सुरक्षित?



### झोपताना इअरप्लग्स लावणे धोकादायक असते का?

प्रत्येक मानवाला किमान सात ते आठ तास झोप घेणे आवश्यक असते. सामान्य इअरप्लग्स रात्रभर घातल्याने कानांमध्ये मेण जमा होऊ शकतो. जर असे इअरप्लग्स साफ नसतील, तर इन्फेक्शन होण्याची शक्यता असते. तसेच झोपताना इअरप्लग्स वापरण्याची वाईट सवय देखील लागू शकते. या सवयीमुळे व्यक्तीच्या शरीरावर परिणाम होऊ शकतो. तर इअरप्लग्समुळे कान दुखावला जाऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, काही ठराविक इअरप्लग्स वापरणे योग्य समजले जाते.

- मेण (wax) : हे इअरप्लग्स काहीसे जाड असतात. त्यामुळे यांचा वापर करण्याआधी ते व्यवस्थितपणे पिळणे आवश्यक असते.
- फोम (foam) : हे इअरप्लग्स Polyvinyl chloride किंवा Polyurethane या घटकांपासून तयार केले जातात. कानांमध्ये लावण्यापूर्वी ते पिळावे लागतात, जेणेकरुन पुढे ते कानांमध्ये फिट होतील.
- सिलिकॉन (silicone) : हे इअरप्लग्स मऊ असल्याने ते कानांच्या आत जाऊन अडकण्याची शक्यता असते. त्यामुळे सिलिकॉन इअरप्लग्स इअर कॅनलच्या बाहेरील भागांमध्ये ठेवले जातात.
- तज्ज्ञांच्या मते, मेण आणि फोम या प्रकारातील इअरप्लग्स झोपताना वापरणे योग्य समजले जाते. तसेच झोप घेताना सिलिकॉन इअरप्लग्स न वापरण्याचा सल्ला दिला जातो.

### Earplugs म्हणजे काय?

रात्री आवाजामुळे झोपमोड होऊ नये यासाठी इअरप्लग्स वापरले जातात. या छोट्या उपकरणामुळे झोपेत कोणत्याही प्रकारचा आवाज रोखला जातो किंवा त्याची तीव्रता कमी होते. गेल्या काही वर्षांमध्ये या उपकरणाच्या वापरकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आवाजामुळे झोपेत व्यत्यय आल्यास त्याचा आरोग्यावर शारीरिक आणि मानसिक त्रास होऊ शकते. त्यातून पुढे तणाव, थकवा याचे प्रमाण वाढू शकते. या समस्या उद्भवू नयेत यासाठी इअरप्लग्सचा वापर केला जातो. यामुळे कानात पाणी, धूळ, कचरा जात नाही आणि कानांचे संरक्षण देखील होते.

### कानांमध्ये इअरप्लग्स लावल्याने

Noise reduction म्हणजेच एखाद्या आवाजाची तीव्रता कमी करणे. कर्कश, कानाला सहन न होणाऱ्या अतितीव्रता असलेल्या आवाजापासून संरक्षण म्हणून इअरप्लग्स लावले जातात. कॉन्सर्ट्स, डीजे असलेल्या ठिकाणी याचा वापर करणे फायदेशीर ठरते. इअरप्लग्स कानामध्ये लावल्याने जास्त तीव्रता असलेला आवाज कानांपर्यंत पोहचण्यास अडथळा निर्माण होतो. एखाद्या व्यक्तीच्या घोरण्यामुळे झोपमोड होऊ शकते. काही वेळेस बांधकामामुळे होणारा आवाज, शेजारच्या घरातील लहान मुलाचं रडणं यामुळे रात्री जाग येऊ शकते. अशा वेळी खास झोपताना वापरायचे इअरप्लग्स कानांमध्ये लावू शकता. इअरप्लग्स लावल्याने पाणी कानांमध्ये जाण्यास अडथळा होतो. परिणामी पोहतानाही या उपकरणाचा वापर केला जातो. इअरप्लग्स लावण्याआधी कान स्वच्छ करा. कान आतून ओले असल्यास इअरप्लग्स लावू नये. मोठा आवाज ब्लॉक होईल असा अंदाज घेत इअरप्लग्स कानांमध्ये लावा. जास्त आत ढकलू नका.



**व्हॉट्सअ‍ॅप या रोजच्या वापरातल्या सोशल मीडिया ॲपमधील काही सोप्या ट्रिक्सची माहिती आम्ही महिलांना देणार आहोत. या ट्रिक्स महिला सुरक्षेच्या, त्यांच्या गोपनीयतेच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वपूर्ण आहेत. ऑनलाइन पद्धतीने होणारा गैरप्रकार टाळण्यासाठी यांची मदत होऊ शकते.**

# महिलांसाठी सेफ्टी ट्रिक्स

- Block आणि Report : बहुतांश स्त्रियांना अनोळखी नंबरवरुन मेसेज किंवा कॉल येत असतात. यांचा नेहमीच त्रास होत असतो. ब्लॉक आणि रिपोर्ट केल्याने या समस्येवर मात करता येईल. एखादा नंबर ब्लॉक केल्यामुळे समोरची व्यक्ती मेसेज करु शकणार नाही. तर रिपोर्ट केल्याने त्या व्यक्तीने पाठवलेले शेवटचे पाच मेसेज तसेच चॅटमध्ये राहतील. पुरावा म्हणून हे मेसेज वापरले जाऊ शकतात.
- Disappearing messages : व्हॉट्सअ‍ॅपमध्ये 'end-to-end encryption' ही सुविधा उपलब्ध आहे. तरीही काही यूजर्सना अधिक गोपनीयता हवी असते. या फीचरमुळे पाठवलेला मेसेज चोवीस तास, सात दिवस किंवा नव्वद दिवस अशा ठराविक कालावधीनंतर अदृश्य होतो. 'view once' या फीचरचा वापर केल्याने शेअर केलेल्या फोटो किंवा व्हिडीओचा रेकॉर्ड राहत नाही.
- Screenshot blocking : व्हॉट्स ॲपवरील फोटो, व्हिडीओ किंवा मेसेज यांचा स्क्रीनशॉट काढता येतो. 'view once' चा वापर केल्यानंतरही स्क्रीनशॉट काढण्याची परवानगी व्हॉट्स ॲप देते. अशा वेळी स्क्रीनशॉट ब्लॉकिंगचा वापर करता येतो. या ट्रिकमुळे समोरची व्यक्ती चॅटमध्ये असलेल्या कोणत्याही गोष्टीचा स्क्रीनशॉट काढू शकणार नाही. तसेच स्क्रीनशॉट ब्लॉकिंगचा वापर केल्यास स्क्रीन रेकॉर्डिंग करणे अशक्य असते. यामुळे चॅट, फोटो किंवा व्हिडीओ यांचे स्क्रीन रेकॉर्डिंग केल्यानंतर तयार होणाऱ्या व्हिडीओमध्ये काहीही दिसणार नाही.
- Exit groups without notifying : सुरुवातीला एखाद्या यूजरने ग्रुप लेफ्ट केल्यावर ग्रुपमध्ये असलेल्या अन्य सदस्यांना त्याबद्दलची माहिती मिळत असे. आता व्हॉट्सअ‍ॅपच्या प्रायव्हसी सेटिंग्सचा वापर करुन यूजर्स इतरांना सूचित न करता ग्रुपमधून बाहेर पडू शकतात. ग्रुपच्या ॲडमिनला मात्र ठराविक व्यक्तीने ग्रुप सोडल्याचा मेसेज दिसतो.
- Control on your personal details : यूजर्सना त्यांच्या वैयक्तिक माहितीचे व्यवस्थापन करण्याची सोय व्हॉट्स ॲपने दिली आहे. प्रोफाईल फोटो, लास्ट सीन, ऑनलाइन स्टेटस अशा गोष्टी कोण पाहत आहे किंवा कोण पाहू शकणार आहे हे यूजर्स स्वतः ठरवू शकतात. ही माहिती कोणापर्यंत पोहचू शकते यावर नियंत्रण ठेवू शकता.

### Enable 'Two-Step Verification' feature

'Two-Step Verification' फीचरमुळे कोणत्याही यूजरला सुरक्षेचा अतिरिक्त स्तर जोडता येतो. हे फीचर वापरण्यासाठी सहा अंकी पिन आवश्यक असतो. हा पिन टाकून व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट रिसेट किंवा व्हेरिफाय करता येते. फोन/सिम कार्ड चोरीला गेल्यास अथवा फोन खराब झाल्यास या फीचरची मदत घेता येते. परवानगी शिवाय एखाद्या अनोळखी ग्रुपमध्ये ॲड होणे त्रासदायक असते. व्हॉट्सअ‍ॅपमधील सेटिंग्समध्ये काही बदल करुन कोणत्या ग्रुपमध्ये ॲड होऊ शकता यावर नियंत्रण ठेवता येते. यासाठी Go to Settings »» Privacy »» Groups, and set the following असे बदल करा.



# एआयच्या माध्यमातून लोकशाही सशक्त करण्याची संधी; महाराष्ट्र तंत्रज्ञान क्रांतीचे केंद्र -ॲड. आशिष शेलार

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)** -एआय ही केवळ तंत्रज्ञान क्रांती नसून, ती लोकशाही अधिक सशक्त करण्याची संधी आहे. सुरक्षित आणि स्मार्ट शासनाची गरज लक्षात घेता महाराष्ट्राने एआयचा प्रशासनात प्रभावी वापर केला असल्याचे सांगून महाराष्ट्र या तंत्रज्ञान क्रांतीचे केंद्र बनले असल्याचा विश्वास राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'महा एआय: बिल्डिंग सेफ, सिक्युअर अँड स्मार्ट गव्हर्नन्स' या सत्रात ते बोलत होते. या व्यासपीठावर माहिती व तंत्रज्ञान सचिव वीरेंद्र सिंग उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासनाला मानवी चेहरा देण्याबरोबरच अधिक वेगवान, पारदर्शक केले असल्याचे सांगून श्री शेलार यांनी महाराष्ट्र शासनाने केलेल्या डिजिटल प्रवासाची सविस्तर माहिती दिली. मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या 'महा क्राईम' प्रकल्पामुळे गुन्हेगारी रोखणे, तपास प्रक्रिया गतिमान करणे आणि पारदर्शकता वाढविणे शक्य झाले. या प्रणालीचे मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनीही कौतुक केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## बाळशास्त्री जांभेकर यांना मुख्यमंत्र्यांकडून अभिवादन



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** - मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आणि थोर समाजसुधारक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## Change In Name

My Old Name is SYED ISHAQUE NOORUL HAQUE which now I am changing as New Name NOOR UL HAQUE ISHAQUE SYED Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - H. No. 9-6-326, UMAR COLONY DEGLOOR NAKA ROAD, NANDED-431604

## Change In Name

My Old Name is SANA FIRDOS AYYUB KHAN which now I am changing as New Name SANA FIRDOS SYED MUNEER Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Address - Farooq Nagar Taroda Bk. Nanded Maharashtra-431605

Mo.No. 7219489550

## 'हिंद दी चादर' शहीदी समागम सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम

**सिंधुदुर्गनगरी(प्रतिनिधी)**- शीख धर्माचे नववे गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम सोहळ्यानिमित्त 'हिंद दी चादर' अंतर्गत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात जनजागृती अभियानास उत्साहात प्रारंभ झाला आहे. खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या भव्य समागम सोहळ्याच्या निमित्ताने जिल्ह्यात दाखल झालेल्या चित्ररथाला शुक्रवारी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी झेंडा दाखवून अभियानाचा शुभारंभ केला.

या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्रीपाद दामले, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, तहसीलदार चैताली सावंत, कोल्हापूर जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी फारुक बागवान, नायब तहसीलदार प्रदीप पवार, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक गणेश हुक्केरी तसेच जिल्हास्तरीय समितीचे सदस्य उपस्थित होते.

## टीसी हरवली

माझी कु. सुप्रिया तानाजी वाघमारे या नावाची इयत्ता दहावी नापासची टी. सी. भोकर ते सायाळ दरम्यान बस प्रवासात गहाळ झाली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता- कु. सुप्रिया तानाजी वाघमारे रा. सायाळ ता. भोकर जी. नांदेड

मो.+९१९५७९८३९७८१

कार्यालय

## जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

संचिका क्र. ६९/६२/२०२६ नांदेड | क्र.जि.व.अ-चौकशी-१/१३०/२०२६
दिनांक---फेब्रुवारी/२०२६

### जाहीर प्रगटन

**उम्मदी अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणे बाबत.**

**वक्फ संस्थेचे नाव**-Graveayrd (Old)(On Nowghat Behind Sarai Meer alam) and Grave of Peer Sab **पत्ता-नांदेड ता. जि. नांदेड**

**उपरोक्त वक्त संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास नोंदणीकृत असून, अर्जदार अजमत बेग व इतर (४) लोकांनी दि. ०५/०२/२०२६ प्रमाणे सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ (०५) वर्षांचा असून, व्यवस्थापन समिती निवडीची रित निवडणुकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अजमत बेग फरीद बेग | अध्यक्ष |
| २. | मिर्झा इस्माईल बेग बशीर बेग | उपाध्यक्ष |
| ३. | सय्यद अहेमद सय्यद हुसेन | सचिव |
| ४. | शेख सिद्दीक अब्दुल गफूर | कोषाध्यक्ष |
| ५. | मिर्झा मेराज बेग मिर्झा हमीद बेग | सदस्य |
| ६. | अहेमद हुसेन मोहम्मद उस्मान | सदस्य |
| ७. | नजीर अहेमद मोहम्मद उस्मान | सदस्य |
| ८. | ईकबाल बेग बशीर बेग | सदस्य |
| ९. | अब्दुल हक्क अब्दुल खादर | सदस्य |
| १०. | हबीब बेग मुसा बेग | सदस्य |
| ११. | शेख अजमत शेख गफुर | सदस्य |

**सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय नांदेड, पत्ता- मस्जिद जुनी इदगाह नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे. विहित वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.**

**मो. मोतासिम अन्सारी**
**जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय मुखेड**
**जा.क्र.२०२५/संकिर्ण/जन्म-मृत्यु नोंद/सिआर- दिनांक:- १६/०२/२०२६**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार सय्यद जाहेद इस्माईल रा. मुखेड जन्माची दिनांक २८/०९/२००७ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म/मृत्यू निबंधक नगर परीषद मुखेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, नामे सय्यद जाहेद इस्माईल रा. मुखेड जन्माची दिनांक २८/०९/२००७ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटना द्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे सय्यद जाहेद इस्माईल रा. मुखेड जन्माची दिनांक २८/०९/२००७ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची सर्व जनतेनी नोंद ध्यावी.

तालुका दंडाधिकारी,
मुखेड ता. मुखेड जि. नांदेड.

## जाहीर प्रगटन

मौ. बारड ता. मुदखेड जि. नांदेड हद्दीतील शेत गट क्र. ५४१ असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ०.८१ आर आहे. श्री ज्ञानेश्वर एकनाथ रत्नपारखी रा. देशमुख गल्ली बारड ता. मुदखेड, जि. नांदेड यांच्याकडून श्री विनोद अशोकराव साखरे रा. श्रीनगर नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, त्यांना बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

ज्याची चतुःसिमा
पूर्वेस- तुकाराम एकनाथ रत्नपारखी
पश्चिमेस- योगेश भानुदास रत्नपारखी
दक्षिणेस-डॉ. पुरुषोत्तम दाड
उत्तरेस-नागार्जुन बालाजी रत्नपारखी.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील शेत जमिनीबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा, आक्षेप किंवा सरकारी/निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या ०७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. नंतर शेत जमिनीचे खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

तर्फे
ॲड. सावित्री जोशी
गोकुळ निवास सोमेश कॉलनी
नांदेड
मो. ९४२१७६१८९८

जाहीर प्रगटन देणार
१. विनोद अशोकराव साखरे
मो. ९००४८६२२२९

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४५/२०२६
पुढील तारीख २४.०३.२०२६

अर्जदार ०१. शंकर पि. माधवराव बासरे, वय ४८ वर्षे व्यवसाय शेती, ०२. रुद्र पि. शंकर बासरे वय ०६ वर्षे, अ. पालन कर्ते वडील अर्जदार क्र. १ - दोघेही रा. भोसी, ता. बिलोली जि. नांदेड.

विरुध्द
गैरअर्जदारः निरंक
विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हा मयत श्रीकांत शंकरराव बासरे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हे मयत श्रीकांत शंकरराव बासरे यांचे वडील असुन अर्जदार क्रमांक ०२ हा अज्ञान भाउ आहे. मयत मयत श्रीकांत शंकरराव बासरे यांचे आई रुक्मीनबाई भ्र. शंकरराव बासरे यांचा मृत्यू दिनांक १२.०६.२०१६ रोजी झाला असुन त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्रमांक ०१ यांनी कमल शंकर बासरे हिच्या सोबत विवाह केलेला आहे. मयत श्रीकांत शंकरराव बासरे यांचा मृत्यू दिनांक २४.११.२०२३ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार यांना मयत श्रीकांत शंकरराव बासरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १६/०२/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली

सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६ / २०२६ ज्योती व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार- १. ज्योती प्रल्हाद भेदेकर, वय ४२ वर्षे, २. साक्षी पि. प्रल्हाद भेदेकर, वय २५ वर्षे, ३. सांची पि. प्रल्हाद भेदेकर, वय- १९ वर्षे, ४. रामा पि. गरीबा भेदेकर, वय ८५ वर्षे, ५. भागरथबाई भ्र. रामा भेदेकर, वय- ७६ वर्षे, सर्व रा. चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड

विरुद्ध
निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत प्रल्हाद पि. रामा भेदेकर यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ हया मुली असुन अर्जदार क्र. ४ हे वडील आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ ही आई आहे. अर्जदार हे मौजे चिटमोगरा ता. बिलोली जि.नांदेड येथे वास्तव्यास होते. मयत प्रल्हाद पि. रामा भेदेकर यांचा मृत्यु दिनांक १८/०१/२०२६ रोजी काळा बु. येथे अपघाती मृत्यु झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत प्रल्हाद पि. रामा भेदेकर यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०१/०४/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून

**सहा. अधीक्षक**
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,
बिलोली

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय मुखेड**
**जा.क्र.२०२५/संकिर्ण/जन्म-मृत्यु नोंद/सिआर- दिनांक:- १६/०२/२०२६**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार नवाज शौकत पठाण रा. मुखेड जन्माची दिनांक ०७/११/१९९१ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म/मृत्यू निबंधक नगर परीषद मुखेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, नामे नवाज शौकत पठाण रा. मुखेड जन्माची दिनांक ०७/११/१९९१ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटना द्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे नवाज शौकत पठाण रा. मुखेड जन्माची दिनांक ०७/११/१९९१ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची सर्व जनतेनी नोंद ध्यावी.

तालुका दंडाधिकारी,
मुखेड ता. मुखेड जि. नांदेड.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय मुखेड**
**जा.क्र.२०२५/संकिर्ण/जन्म-मृत्यु नोंद/सिआर- दिनांक:- १६/०२/२०२६**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार शेख अदनान मुस्ताक अहेमद रा. मुखेड जन्माची दिनांक ०९/०९/२००० मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म/मृत्यू निबंधक नगर परीषद मुखेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, नामे शेख अदनान मुस्ताक अहेमद रा. मुखेड यांचे स्व:ताचे जन्माची दिनांक ०९/०९/२००० मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटना द्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे शेख अदनान मुस्ताक अहेमद रा. मुखेड यांचे स्व:ताचे जन्माची दिनांक ०९/०९/२००० मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची सर्व जनतेनी नोंद ध्यावी.

तालुका दंडाधिकारी,
मुखेड ता. मुखेड जि. नांदेड.

## जाहीर प्रगटन

तहसीलदार तथा दंडाधिकारी यांचे न्यायालयात
प्रकरण:-जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत.
अर्ज क्र. १२०२६

विषय-जन्म मृत्यू नोंदणी अधिकार सुधारीत आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबत.

संदर्भ - अर्जदार बालाजी नागोराव राखे रा. राहेर ता. नायगाव खै ता. नायगाव जि. नांदेड यांचे अर्ज दि.२०.०२.२०२६

ज्याअर्थी, अर्जदार बालाजी नागोराव राखे रा. राहेर ता. नायगाव खै ता. नायगाव जि. नांदेड यांनी त्यांची मुलगी नामे अश्विनी बालाजी राखे यांचा जन्म दिनांक २४.०३.२००४ अर्जात नमूद रोजीची नोंद करुन देणे बाबत विनंती केली आहे. ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय राहेर ता. नायगाव जिल्हा नांदेड येथे जन्माच्या दाखल्याची मागणी अर्ज दिला असता संबंधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय राहेर ता. नायगाव जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दिनांक १८.०२.२०२६ रोजीचे अर्ज सादर केलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) जन्म व नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदाराच्या जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय राहेर ता. नायगाव, जि. नांदेड यांना जन्म/मृत्यू नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर मा. न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसात सादर करावा अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२०/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**तहसीलदार तथा दंडाधिकारी**
**ता. नायगाव, जि. नांदेड**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय मुखेड**
**जा.क्र.२०२५/संकिर्ण/जन्म-मृत्यु नोंद/सिआर- दिनांक- १६/०२/२०२६**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार सय्यद सोहेब इस्माईल रा. मुखेड जन्माची दिनांक १६/१०/१९९९ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म/मृत्यू निबंधक नगर परीषद मुखेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, नामे सय्यद सोहेब इस्माईल रा. मुखेड जन्माची दिनांक १६/१०/१९९९ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटना द्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे सय्यद सोहेब इस्माईल रा. मुखेड जन्माची दिनांक १६/१०/१९९९ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची सर्व जनतेनी नोंद ध्यावी.

**तालुका दंडाधिकारी,**
**मुखेड ता. मुखेड जि. नांदेड.**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय मुखेड**
**जा.क्र.२०२५/संकिर्ण/जन्म-मृत्यू नोंद/सिआर- दिनांक- १६/०२/२०२६**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार शेख हसनोद्दीन अल्लाऊद्दीन रा. मुखेड जन्माची दिनांक ०३/०३/१९८७ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म/मृत्यू निबंधक नगर परीषद मुखेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, नामे शेख हसनोद्दीन अल्लाउद्दीन रा. मुखेड यांचे स्व:ताचे जन्माची दिनांक ०३/०३/१९८७ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटना द्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे शेख हसनोद्दीन अल्लाउद्दीन रा. मुखेड यांचे स्व:ताचे जन्माची दिनांक ०३/०३/१९८७ मौ. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची सर्व जनतेनी नोंद ध्यावी.

**तालुका दंडाधिकारी,**
**मुखेड ता. मुखेड, जि. नांदेड**


## प्लॉट विकणे आहे

डी मार्ट समोरील शिवरोड लगत गट क्रमांक १३३ मधील सूर्यनगरातील दोन प्लॉट विकणे आहे. प्लॉट क्रमांक ५ व ६. साईज ३० बाय ६०. १८०० चौरस फुट. पूर्वमुखी प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

**संपर्क- मो. ९३७०७४८६०२**

## पाहिजे


कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# परीक्षेशी संबंधित नसलेली व्यक्ती केंद्र परिसरात आढळल्यास कठोर कारवाई -राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)**– शुक्रवारी इयत्ता १० वीची परीक्षा जिल्ह्यातील १७८ केंद्रांवर सुरू झाली. मराठी विषयाच्या पेपरसाठी नोंदणीकृत ४४ हजार ९९१ परीक्षार्थ्यांपैकी ४३ हजार ९४९ परीक्षार्थी उपस्थित होते. उपस्थितीची टक्केवारी ९७.६८ इतकी नोंदविण्यात आली.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हीडीओ कॅमेऱ्यांच्या सहाय्याने संपूर्ण वेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व १७८ केंद्रांवर आजची इयत्ता १० वीची परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात पार पडली.

जिल्ह्यातील काही केंद्रांवर परीक्षा कालावधीत परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्ती परिसरात दिसून आल्या आहेत. ही बाब भारतीय न्याय संहिता कलम १६३ चे उल्लंघन असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे उद्यापासून इयत्ता १२ वी तसेच पुढील सर्व इयत्ता १० वी व १२ वीच्या पेपरदरम्यान परीक्षा केंद्र परिसरात परीक्षेशी संबंध नसलेली व्यक्ती आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दिला आहे.

सहायक जिल्हाधिकारी झेनितचंद्र दोंतुला यांनी इयत्ता १२ वीच्या परीक्षेदरम्यान दहेली तांडा केंद्रास भेट दिली असता त्यांना काही अनधिकृत व ओळखपत्र नसलेल्या व्यक्ती परीक्षा केंद्र परिसरात फिरताना आढळून आल्या. ही बाब निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व परीक्षा केंद्रांवर कठोर अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. संबंधित व्यक्ती त्या शाळेचे कर्मचारी किंवा संस्थेचे प्रतिनिधी असले तरी परीक्षेशी थेट संबंध नसल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी इयत्ता १२ वीचा महत्त्वाचा गणित विषयाचा पेपर असल्याने जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना विविध परीक्षा केंद्रांना भेटी देण्याचे निर्देश दिले आहेत.

इयत्ता १० वी व १२ वीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त व शिस्तबद्ध वातावरणात पार पडत असून विद्यार्थी व पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# रस्ता सुरक्षा पथक पुन्हा कार्यरत; शांतता भंग करणाऱ्या ६२ जणांवर गुन्हा

## विनानंबर, सायलेन्सरमध्ये छेडछाड, फटाका बुलेट, बेशिस्त १७ वाहनांवर कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या शांततेला बाधा पोहोचून कायदा व सुव्यवस्था बाधित करणाऱ्या तब्बल ६२ जणांविरुद्ध रस्ता सुरक्षा पथकाने कारवाई केली. यासोबतच शहराच्या वेगवेगळ्या ठाण्यांतर्गत फटाका बुलेटधारकांविरुद्ध कारवाई करून १७ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी स्थापन केले असता सुरक्षा पथक (सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह) अंतर्गत पथकाने कारवाई केली. पथकप्रमुख सपोनि भागवत नागरगोजे व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक १८ व १९ फेब्रुवारी रोजी शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या व्यक्तीवर, विना नंबर, सायलेंसर व बेशिस्त वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन भाग्यनगर सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील पोउपनि दर्शने व चाली क्रमांक १,२,३ मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान तरोडा नाका व सत्कार वाईन शॉप, जंगमवाडी, जिरायत मैदान, भगीरथनगर येथे १२ व्यक्ती हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच कर्कश आवाज करणारे, विना नंबर असलेले बेशिस्त वाहन व फटाका बुलेट अशा ८ वाहनांवर मोटार वाहन कायदाप्रमाणे कारवाई करून एकूण ३ हजार ५०० रुपयांचा दंड आकरण्यात आला व काही वाहने जप्त करण्यात आली. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्सची तपासणी करण्यात आली.

पोलीस स्टेशन इतवारा सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक १, २ व ३ मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान जुना मोंढा येथे १३ जण हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच दोघेजण दारू विक्रीचे साहित्य, पाणी पाउच, चकणा विक्री करीत असतांना मिळून आल्याने त्यांच्यावर कलम ६८ म प्रो का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कर्कश आवाज करणारे, विना नंबर असलेले बेशिस्त वाहन व फटाका बुलेट अशा २ वाहनांवर मोटार वाहन कायदा प्रमाणे कारवाई करून एकूण १ हजार ५०० रूपयांचा दंड आकरण्यात आला व काही वाहने जप्त करण्यात आली.

# दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना जिल्हा माहिती कार्यालयात अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठी पत्रकारितेचे आद्यजनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दि. २० फेब्रुवारी रोजी नांदेड जिल्हा माहिती कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपसंपादक अलका पाटील, वरिष्ठ लिपीक काशिनाथ आरेवार, लिपीक अनिल चव्हाण, अहेमद बेग, शिपाई गंगाधर निरडे उपस्थित होते.

# नायगावात दहावीच्या परीक्षेला ३१८० विद्यार्थी; ६० अनुपस्थित

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यात इयत्ता दहावीच्या परीक्षेचा पहिला पेपर शांत व सुरळीत वातावरणात पार पडला. तालुक्यातील विविध केंद्रांवर एकूण ३ हजार १८० विद्यार्थी नोंदणीकृत असून त्यापैकी ३ हजार १२० विद्यार्थी उपस्थित राहिले, तर ६० विद्यार्थी अनुपस्थित राहिल्याची माहिती परीक्षा केंद्र कार्यालयाकडून देण्यात आली.

शंकरनगर येथील श्री साईबाबा विद्यालय, गोदावरी मनार पब्लिक स्कूल तसेच हाळदा येथील श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय, बरबडा येथील जि. नेहरू विद्यालय, घुंगराळा येथील जि. प. हायस्कूल आदी केंद्रांवर काही विद्यार्थी गैरहजर होते. मरवाळी तांडा केंद्रावर सर्वाधिक १० विद्यार्थी अनुपस्थित होते. नायगाव शहरातील जनता हायस्कूल व यमुनाबाई माध्यमिक विद्यालय येथे प्रत्येकी एक विद्यार्थी गैरहजर होता.

कुंटूर, कोलंबी, नरसी तसेच इतर केंद्रांवरही किरकोळ अनुपस्थिती नोंदविण्यात आली. परीक्षा शांततेत पार पडण्यासाठी केंद्रप्रमुख व प्रशासनाने आवश्यक खबरदारी घेतली होती. दरम्यान, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील यांनी कोलंबी केंद्रास भेट देऊन पाहणी केली. प्रशासनाच्या दक्षतेमुळे दहावीच्या परीक्षेची सुरुवात निर्विघ्नपणे झाल्याचे चित्र दिसून आले.

# राष्ट्रीय महामार्गावरील धनेगाव येथील एकही बोगदा रद्द होणार नाही

## आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचे शिष्टमंडळास आश्वासन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– धनेगाव येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर दूध डेरी ते धनेगाव फाटा दरम्यान पाच बोगदे मंजूर झाले आहेत. हे सर्व बोगदे होणार असून रस्त्याचे काम रखडल्यामुळे सतत वाहतूक समस्या निर्माण होत आहे. जनतेच्या हितासाठी या प्रकरणावर सकारात्मक तोडगा काढला जाईल, असे आश्वासन आमदार आनंदराव बोंढारकर यांनी धनेगाव येथील शिष्टमंडळास दिले.

धनेगाव ते दूध डेरी दरम्यान बोगदे व्हावेत या मागणीसाठी गावकऱ्यांनी काम बंद केले होते. राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून या ठिकाणी पाच बोगदे मंजूर झाले होते. परंतु गुत्तेदाराने रस्त्यालगत दुकान असलेल्या व्यापाऱ्यांना हाताशी धरून पाच ऐवजी दोनच बोगदे करण्याचा डाव आखला आहे, अशी चर्चा होऊ लागल्याने माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब शिंदे, माजी जि. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे, माजी सदस्य भुजंगराव भालके, गंगाधर पाटील कावळे, कोंडीबा कवाळे, नारायण कवाळे, गुलाबराव गायकवाड, भगवान कावळे, माधव देशमुख, शिवानंद कावळे, गंगाधर देशमुख, बळीपाटील शिंदे, शैलेंद्रसिंग ठाकूर, शेख एजाज, कौसर भाई, मन्मथ देशमुख, खालील भाई, परमेश्वर देशमुख, रमेश वाघमारे, दिलीप गजभारे, शेख अहमद, मुखीद पठाण, इरफान शेख जानी, शेख अहमद, शेख सलोदिन शेख तय्यब, मुक्ती साब दारलूम आदी गावकऱ्यांनी आ. आनंदराव बोंढारकर यांची भेट घेऊन निवेदन दिले.

# छायाचित्रकार सादिकभाई यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –हैदरबाग परिसरातील जुन्या पिढीचे छायाचित्रकार व रॉयल फोटो स्टुडिओचे संचालक मोहमद सादिकभाई (वय ६७) यांचे दि. १९ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, चार मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सादिकभाई यांच्या पार्थिवावर दि. २० फेब्रुवारी रोजी दुपारी इतवारा येथील सराये येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सय्यद मुदस्सर हुसेन अख्यार यांचे निधन



**नांदेड/हैदराबाद (प्रतिनिधी)**– चैतन्य नगर येथील रहिवासी सय्यद मुदस्सर हुसेन अख्यार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने अकस्मात निधन झाले. ते काही काळापासून हैदराबाद येथील शेख पेट परिसरात वास्तव्यास होते. ते मागील काही दिवसांपासून व्हायरल तापाने त्रस्त होते. अचानक प्रकृती खालावल्याने त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

# दहावी परीक्षा केंद्रांवर पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ लातूर विभागाच्या वतीने दहावी शालांत परीक्षेला ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत १४ केंद्रांवर २० फेब्रुवारी पासून सुरूवात झाली. पहिल्या दिवशी २९५२ परिक्षार्थींनी मराठी विषयाचा तर उर्दू १२१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा केंद्रावर पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी चोख पोलीस बंदोबस्त लावला होता.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ लातूर विभागाच्या वतीने २० फेब्रुवारीपासून शालांत प्रमाणपत्र परीक्षेला प्रारंभ झाला असून, ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शिवाजी हायस्कूल सिडको येथे केंद्रप्रमुख म्हणून व्ही. एस. पाटील, जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय विष्णुपुरी येथे केंद्रप्रमुख एम. ए. खदीर, एम. ए. खलील, कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडको येथे वडजे सूर्यकांत, इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय सिडको येथे केंद्रप्रमुख डॉ. गरड तर महात्मा गांधी महाविद्यालय सिडको केंद्रप्रमुख सांगळे चंद्रकांत माधवराव, शिवशक्ती माध्यमिक विद्यालय काकांडी येथे केंद्रप्रमुख शेख शादुल गुलाब, मधुबन महाराज विद्यालय धनेगाव येथे केंद्रप्रमुख वडजे महेश तर राष्ट्रमाता मराठी उर्दू माध्यमिक विद्यालय वाजेगाव केंद्र प्रमुख गाडेकर तुकाराम, शिवाजीराव पाटील हायस्कूल वाजेगाव, केंद्र प्रमुख आडे शाहु, शांती निकेतन पब्लिक स्कूल सिडको येथे केंद्र प्रमुख धुळे माधवकुमार, महात्मा फुले पोस्ट बेसिक आश्रम शाळा वाघाळा, केंद्र प्रमुख केंद्रे भागवत, तर जुना कौठा येथील माधवराव वटेमोड विद्यालय येथे केंद्र प्रमुख माधवराव वटेमोड तर नरहर कुरुंदकर हायस्कूल जुना कौठा येथे केंद्र प्रमुख म्हणून बि.एस.कंगळे व पिंपळगाव निमजी येथील गोदावरी विघालय येथील केंद्र प्रमुख म्हणून शंकरराव डक केंद्र प्रमुख काम पाहत आहेत.या केंद्रावर परीक्षांना कॉपीमुक्त वातावरणात सुरूवात झाली. पहिल्या दिवशी शिवाजी हायस्कूल सिडको येथे केंद्रावर परीक्षार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

# अरविंदराव मनूरकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– वसंतनगर येथील रहिवाशी तथा जलसंधारण विभागातील सेवानिवृत्त उपअभियंता अरविंदराव गणपतराव मनूरकर (वय ६३ वर्षे) यांचे गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, दोन भाऊ व एक बहीण असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी चार वाजता गोवर्धन घाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी आमदार कै. बळवंतराव पाटील चव्हाण यांचे ते जावई तसेच कै. खासदार वसंतराव चव्हाण यांचे ते मेहुणे तर डॉ. बालाजी मनूरकर यांचे धाकटे बंधू आणि ज्येष्ठ साहित्यिक कै. ग. पि. मनूरकर यांचे द्वितीय चिरंजीव होत.

# नवा मोंढा येथील सार्वजनिक व्यापारी मित्रमंडळाच्यावतीने शिवजयंती उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– सार्वजनिक व्यापारी मित्र मंडळ नवा मोंढा नांदेडच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती१९ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवजयंतीनिमित्त अकरा क्विंटल खिचडी अन्नदान वाटप, भव्य रक्तदान शिबीर व चतुर्मुखी विनायक संगीत संच असेगाव ता. वसमत येथील भजनी मंडळाने विविध धार्मिक कार्यक्रम धेतले. या शिवजयंती उत्सवाचे उद्घाटन आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले तर आ. बालाजी कल्याणकर, नांवामनपाच्या महापौर सौ. ज्योती मुळे यांच्यासह लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती नवा मोंढा व्यापारी असोसिएशनच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त चतुर्मुखी विनायक संगीत भजनी मंडळ असेगाव येथील भजनी मंडळाचा भजनाचा व जिजाऊ रक्तपेढी नांदेड यांच्या वतीने रक्तदान शिबीर व अकरा किवंटल खिचडी अन्नदान वाटप करण्यात आले.

शिवजन्मोत्सव सोहळ्यासाठी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, नांदेड उत्तरचे आ. बालाजी पाटील कल्याणकर, नांवामनपाच्या महापौर सौ. कविता संतोष मुळे, माजी महापौर बलवंत सिंग गाडीवाले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय लहानकर, उपसभापती भुजंग पाटील डक व संचालक मंडळ यांच्या सह लोकप्रतिनिधी व विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात जिजाई रक्तपेढीने रक्त संकलन केले. या रक्तदान शिबिरात ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# किनवट शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

## रॅली, स्पर्धा, रक्तदान शिबीर



**किनवट (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गुरुवार, दि. १९ रोजी किनवट शहरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिवजयंती हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. शिवप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत ध्वजारोहण, अभिवादन, रक्तदान शिबीर, चित्रकला, रंगभरण, भाषण व निबंध स्पर्धा तसेच मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

जयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. साक्षी वाडगुरे या विद्यार्थिनीने रांगोळीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे आकर्षक चित्र साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. शहरातून काढण्यात आलेल्या मोटारसायकल रॅलीमुळे वातावरणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांना अभिवादन करण्यात आल्यानंतर नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास भाजपचे नेते डॉ. अशोक पाटील सूर्यवंशी, क्रांती भीमराव केराम, दिनकर दहिफळे, आनंद मच्छेवार, संदीप केंद्रे यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याच ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरालाही नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या शिबिरात पोलीस निरीक्षक गणेश कराड, फौजदार सागर झाडे, जमादार प्रदीप अत्राम, सुनिल अन्नमवार यांच्यासह एकूण ६२ जणांनी रक्तदान केले. किनवट पालिका कार्यालयातही शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नगर परिषद सभागृहात आयोजित मुख्य कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com